पोर्तुगिजांशी
रणसंग्राम

पोर्तुगिजांशी रणसंग्राम

लेखक
शं. रा. देवळे
बी. ए., एस्. टी. सी.

प्रकाशक
अनुराधा प्रकाशन : पुणे

प्रकाशक

अनुराधा प्रकाशन
१८/२६७ लोकमान्यनगर
पुणे ४११ ०३०

सर्व हक्क सुरक्षित

आवृत्ती पहिली
१९६६
पुनर्मुद्रण पहिले
१९६८
पुनर्मुद्रण
१९८९

धन्यवाद

पोर्तुगिजांशी रणसंग्राम ह्या पुस्तकाच्या तयारीसाठी अनेक संदर्भ-ग्रंथांचा आणि थोर व्यक्तींच्या संभाषणांचा उपयोग झाला. या सर्वांचा मी ऋणी आहे.

शं. रा. दे.

क शा सा ठी

१५ ऑगस्ट १९४७ रोजी भारताला स्वातंत्र्य मिळाले. त्यानंतर पाँडेचरी, चंद्रनगर इत्यादी फ्रेंच वसाहतीही सामोपचाराने भारतात विलीन झाल्या, पण गोव्याचा प्रश्न मात्र एक ज्वलंत प्रश्न बनला.

पोर्तुगिजांच्या तावडीतून गोवा मुक्त करण्याचे अनेक प्रयत्न झाले. सत्याग्रहींनी सत्याग्रह केले, क्रांतिकारकांनी आपल्या मार्गांनी प्रयत्न केले; पण हिंदुस्थानात जलमार्गाने प्रथम आलेल्या युरोपियनांपैकी पोर्तुगिज मात्र गोव्याचा ताबा सुखासुखी सोडीनात.

सर्व प्रयत्न फसल्यावर अखेर भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांनी सेनापती जयंतनाथ चौधरी यांच्याकडे गोव्याच्या विजयमोहिमेचे नेतृत्व दिले; आणि मग मात्र पोर्तुगीज सत्तेने गोव्यातून आपला गाशा गुंडाळला. पोर्तुगीजांच्या गुलामगिरीतून गोवा स्वतंत्र झाला, भारतात विलीन झाला. आता या पुढील त्याचे भारतातील नैसर्गिक स्थान तो यथाकाळ मिळवील, यात शंका नाही; तेव्हा अशा स्थितीत गोव्याच्या इतिहासाची ओळख जिज्ञासू वाचकांना करून देण्यासाठी हा—

पोर्तुगिजांशी रणसंग्राम !

अनुक्रम

१	फिरंगी आले	५
२	गोमंतक—दक्षिणेतील काश्मीर	९
३	फिरंग्यांच्या आधीचा गोवा	१२
४	पोर्तुगीज गोवा गिळतात	१५
५	दीव, दमण, नगरहवेली आणि अंजदीव	२०
६	धार्मिक अत्याचार	२४
७	गोवामुक्ततेचे छत्रपतींचे प्रयत्न	३०
८	वसईची मोहीम	३८
९	राण्यांची महाप्रतापी परंपरा	४७
१०	गोव्यातील सत्याग्रह	५१
११	विजय मोहीम	५५
१२	गोव्यातील देवस्थाने	६२
१३	गोमंतकाच्या इतिहासातील दिनविशेष	६३
१४	गोमंतकातील स्थलविशेष	६९

□ □ □

१ : फिरंगी आले

एके काळी भारत वैभवाच्या शिखरावर होता. जगभर भारताची ‘ सुवर्णभूमी ’ या नावाने प्रसिद्धी होती. भारतातून सोन्याचा धूर निघत होता, त्या धुराने इतरांचे डोळे दिपून जात होते. हिंदुस्थानात जाऊन आलेल्यांनी सांगितलेल्या हकीगती चित्तवेधक असत. चंद्रगुप्ताच्या दरबारी येऊन गेलेल्या एका ग्रीक प्रवाशाने लिहून ठेवले आहे : भारतातील लोक उत्तम शेतकरी आणि कुशल कारागीर असून ते फार मेहनती आहेत. येथील लोकांना व्यसने नाहीत. स्त्रिया प्रतिव्रता आहेत. येथे गुलामगिरीची पद्धत नाही. लोक पराक्रमी आहेत. त्यांना खोटे बोलणे आवडत नाही. येथे दाराला कुलूप लावण्याची आवश्यकता नाही...”

हळूहळू हिंदुस्थानचा युरोपातील देशांशी व्यापार सुरू झाला. भारतामधून त्या जुन्या काळी हिरे, मोती, लोकरीचे गालिचे, तलम सूत आणि रेशमी कापड, साखर, केशर व मसाल्याचे पदार्थ युरोपात जात. या सर्व वस्तूंना युरोपातील बाजारपेठेत चांगली किंमत येत असे.

भारतामधून मालाची ने–आण करण्यासाठी त्या वेळी तीन मार्ग होते. त्यांपैकी एक होता खुष्कीचा व इतर दोन होते जलमार्ग. खुष्कीचा रस्ता भारताच्या वायव्य सरहद्दीवरील अत्यंत उंच पर्वतांच्या खिंडीमधून अफगाणिस्थान, इराण व उत्तर तुर्कस्तानमधून युरोपमध्ये जाई. जलमार्गांपैकी एक मार्ग अरबी समुद्रातून एडन, इजिप्तमधून भूमध्य समुद्रातून युरोपात जाई. तर दुसरा मार्ग अरबी समुद्रातून इराणच्या आखातातून इराकमधून युरोपमध्ये जाई.

हे तीनही मार्ग लांबचे व फार त्रासाचे. रस्त्याने हिंस्र पशूंपासून व लुटारूपासून धोका असे. प्रवासास खर्च व श्रम अतोनात पडत असत. खुष्कीच्या प्रवासमार्गावरील देशात मुसलमान लोकांची राज्ये होती. मुसलमानांची व युरोपातील ख्रिस्ती देशांची अनेक वर्षे धर्मयुद्धे चाललेली होती. त्यामुळे युरोपीयन लोकांना हा मार्ग अत्यंत धोक्याचा असे. समुद्रावरील मार्गावर अरब व्यापारी अडथळे करीत.

हा सर्व कोंडमारा टाळण्यासाठी आणि येथील किफायतशीर वस्तूंच्या व्यापारासाठी भारताकडे जाणारा स्वतंत्र, जवळचा व कमी धोक्याचा मार्ग शोधण्याचे प्रयत्न युरोपात सुरू झाले. कल्पक आणि धाडसी लोकांनी त्यात अहमहमिकेने प्रयत्न सुरू केले.

या काळात काही क्रांतिकारक असे शोध लागले. ‘ होकायंत्र ’ तयार झाल्याने समुद्र प्रवासात दिशा नेमक्या समजू लागल्या. ‘ बंदुकीच्या दारू’चा शोध लागल्यामुळे लुटारू, चाचे लोक व हिंस्र प्राणी यांची भीती कमी झाली. ‘ पृथ्वी गोल आहे,’ हा सिद्धांत त्या वेळी सर्वमान्य

झाला. या सिद्धान्ताला अनुसरून, एकसारखे पश्चिम दिशेकडे किंवा एकसारखे पूर्व दिशेकडे गेले की केव्हा तरी भारत देशाचा किनारा लागेल असा विश्वास युरोपातील अनेक देशातील लोकांना निर्माण झाला.

त्या काळी युरोपमध्यें स्पेन व पोर्तुगाल हे दोन देश समुद्रप्रवासात पुढारलेले होते. त्या देशातील धाडसी खलाशी दूरवर सफरी करीत. स्पेनमधून धाडसी कोलंबस भारताचा मार्ग शोधण्यास निघाला. अनेक संकटांच्या नंतर त्याला जमीन सापडली, पण ती भारताची जमीन नव्हती. जगाला माहीत नसणारा असा तो एक आज्ञात भाग होता. त्यालाच पुढे ' अमेरिका ' हे नाव पडले. भारताला जाणाऱ्या मार्गाचा शोध करण्याचे काम पुढे चालूच राहिले.

पोर्तुगीज खलाशी वास्को-डी-गामा याने पोर्तुगालच्या राजाच्या साहाय्याने प्रयत्न सुरू केले. त्याने आपल्याबरोबर चार उत्तम जहाजे घेतली. जहाजांवर सुमारे दीडशे दर्यावर्दी अनुभवी खलाशी होते. उत्तम शस्त्रास्त्रे, बंदुका, दारूगोळा, अन्नधान्य, पाणी, सोने, चांदी असे सामान जहाजावर घेण्यात आले. भारत सापडल्यावर तेथील राजांना भेटीदाखल देता येतील, अशा अनेक नयनमनोहर वस्तूही वास्को–डी–गामाने आपल्याबरोबर घेतल्या. आत्मविश्वास आणि धाडस पाठीशी घेऊन वास्को-डी–गामाने दिनांक २५ मार्च १४९७ मध्ये पोर्तुगालचा किनारा सोडला.

प्रवासातील अनेक संकटे, वादळे, खलाशांची छोटी बंडे यांना तोंड देत देत वास्को–डी–गामा आफ्रिकेच्या दक्षिण टोकाला पोहोचला. तेथे त्याला अरब व्यापारी भेटले. त्यातील एकाच्या साहाय्याने वास्को–डी–गामा आपली जहाजे घेऊन दि. २० मे १४९८ या दिवशी कालिकत या पश्चिम किनाऱ्यावरील बंदरात पोहोचला. सर्व प्रवासास त्याला सुमारे दहा महिने लागले. कालिकत बंदरात वास्को–डी–गामाने

आपली जहाजे नांगरली. त्यास आणि त्याच्याबरोबर असलेल्या लोकांना आपले प्रयत्न सफल झाल्याबद्दल खूप आनंद झाला.

कालिकत बंदरात उतरल्यावर येथील लोकांचीं मने जिंकावयास त्याने सुरुवात केली. बाजारपेठेत मिळणाऱ्या निरनिराळ्या वस्तू व्यापारी सांगतील त्या किंमतीस खरेदी करण्याचा त्यानें सपाटा चालविला. त्यामुळे त्याच्या नावाचा बोलबाला कालिकतचा राजा झामोरीन याच्यापर्यंत गेला. त्याने वास्को-डी-गामाला सन्मानपूर्वक आपल्या भेटीस बोलावले. भेटीच्या वेळी त्याने झामोरीनला निरनिराळ्या बऱ्याच मौल्यवान् वस्तू भेट म्हणून दिल्या. राजाशी अत्यंत आदबीने वागून त्याने राजाचे मन जिंकले. व्यापार करण्यासाठी त्याच्याकडून काही सवलतीही मिळविल्या. वास्को-डी-गामा व त्याचे सहकारी यांची राजदरबारातील आणि बाजारपेठेतील वागणूक अत्यंत सभ्यपणाची होती. पोर्तुगीज भाषेत ' फिडलगी ' म्हणजे ' सभ्य गृहस्थ ! ' त्याचा अपभ्रंश करून येथील लोक या नवप्रवाशांना ' फिरंगी ' म्हणू लागले !

गामा कालिकत येथे थोडे दिवस राहिला. त्याने लवंग, मिरी, सुंठ आणि इतर मसाल्याचे पदार्थ जहाजात भरून घेतले. राजाचा निरोप घेऊन तो पोर्तुगालला परत गेला. तेथे पोहोचताच पोर्तुगालच्या राजाने त्याचा सत्कार केला. राजाने त्याला ' डॉन ' अशी पदवी दिली ! गामाच्या यशाचे पडसाद सर्व युरोपभर उठले.

वास्को-डी-गामाने हिंदुस्थानातून आणलेल्या मालास प्रवासाच्या खर्चाच्या साठपट किंमत आली ! यामुळे तर भयंकर खळबळ उडाली. सुवर्णभूमी भारताशी व्यापार करण्यासाठी युरोपातील निरनिराळी राष्ट्रे तडकाफडकी उठली. त्या सर्वांमध्ये ' फिरंग्या'ची लाट पहिली धडकली ! समुद्रमार्गाने फिरंगी हिंदुस्थानात आले ! व्यापारासाठी त्यांनी कालिकत व कोचीन येथे आपल्या वखारी घातल्या !

□ □ □

२ : गोमंतक—दक्षिणेतील काश्मीर

□ □ □ □ □ □ □ □ □ □ □ □ □ □

'गोमंतक' हे दक्षिण हिंदुस्थानातील काश्मीरच ! पश्चिम किनाऱ्यावर सह्याद्रीच्या कुशीत गोमंतक वसले आहे. गोव्याचा भूप्रदेश फक्त १३०१ चौरस मैलांचा आहे. गोव्याची दक्षिणोत्तर लांबी ६२ मैल असून पूर्वपश्चिम रुंदी सुमारे ४०–४२ मैल आहे. एका बाजूस समुद्र किनारा, तर दुसऱ्या बाजूस डोंगरमाथा. यामुळे गोव्याचा प्रदेश अत्यंत रमणीय आहे.

गोव्याची निसर्गशोभा अवर्णनीय आहे. येथे हिरव्यागार वृक्षांची बनें आहेत. सह्याद्रीच्या उंच उंच कड्यावरून उड्या घेणाऱ्या तेरेखोल, बागची, मांडवी, कोलवाळ, सिंकेरी, जुवारी तरपण आणि साळची या छोटया छोटया नद्या आहेत. काळी नदीचा दूधसागर हा धबधबा अत्यंत मोहक आहे. त्याच्याकडे पाहून डोळ्यांचे पारणे फिटते. नद्यांच्या बरोबरच गोव्यात अनेक खाड्या आहेत. नद्या आणि खाड्या यांचे गोव्यात जाळेच पसरले आहे. एका गावाहून दुसऱ्या गावाला जायचे तर नदी नाहीतर खाडी ओलांडवयास हवीच. गोव्यात सरासरी ९० इंच पाऊस पडतो. नारळ, सुपारी, केळी, काजू, आंबे, फणस, रातांबे यांची झाडे सर्वत्र दिसतात.

गोमंतकात मुरगाव आणि पणजी ही चांगली बंदरे आहेत. दोन्ही बंदरात मोठमोठ्या आगबोटींची वाहतूक सुरक्षित रीतीने होऊ शकते. किनारपट्टीने छोटया मचव्यांची वाहतूक नेहमी चालू असते.

निसर्गाप्रमाणेच गोव्यात खनिज संपत्ती विपुल आहे. कच्चे लोखंड आणि मँगेनीज यांचे मोठेमोठे साठे गोव्यात आहेत. सध्याच्या औद्योगिक युगात दोन्ही धातूंना जबरदस्त महत्त्व आहे. लाखो रुपयांची खनिज द्रव्ये खाणीतून काढून परदेशात पाठविली जातात. विशेषतः जपान, जर्मनी या देशांत येथून खूपच कच्चे लोखंड व मँगेनीज निर्यात होते.

गोमंतकाच्या किनाऱ्यावर खाडयांतून आणि नद्यांतून मासेमारीचा धंदा जोरात चालतो.

गोव्यातील सुमारे निम्मी जमीन लागवडीस आणलेली आहे. कोकणातल्याप्रमाणे गोव्यातील जमिनीत मुख्यतः तांदुळाचे पीक काढतात. काही ठिकाणी वर्षातून दोन पिके काढतात. विहिरींच्या व नद्यांच्या पाण्याचा उपयोगही भाताच्या पिकासाठी काही ठिकाणी केला जातो.

भाताच्या खालोखाल नारळाचे उत्पन्न काढले जाते. उत्तम जातीचे आंबे, फणस, काजू याबद्दलही गोव्याची प्रसिद्धी आहे. कांदे, लसूण, मिरची आणि इतर भाजीपाला जरूरीप्रमाणे काही ठिकाणी पिकवला जातो. त्याला किंमतही चांगली मिळते. शेतीचे उत्पन्न मात्र वर्षातील आठ नऊ महिने पुरेल इतकेच येते. इतराची बाहेरून आयात करावी लागते.

गोव्याच्या जंगलात पुष्कळ उपयुक्त वनस्पती आहेत. इमारती व इतर लाकूड मिळते. सुमारे १२० चौरस मैलभर जंगल पसरलेले असून त्यातील संपत्तीपासून चांगले उत्पन्न मिळते.

गोव्यातील जनता हिंदू, ख्रिस्ती आणि मुसलमान धर्मांची आहे.

‘ ख्रिस्ती ’ म्हणताच डोळ्यांपुढे कोट, पाटलोण, हॅट, बूट घातलेली व्यक्ती उभी राहते. परंतु गोव्यात असे पुष्कळ ख्रिस्ती बांधव आहेत की, जे कमरेला करगोटा व रंगीत रुमालाची लंगोटी याखेरीज दुसरे काही वापरीत नाहीत. हे लोक शेती करतात. नारळ, सुपारी, आंबे यांच्या बागा करतात, काजूपासून दारू गाळतात. रविवारी प्रार्थनामंदिरात जाऊन प्रार्थना करतात. लग्नकार्यात कुळींचा ते शोध घेतात. ख्रिस्ती बांधवही हिंदू देवतांना नवस करतात. जनतेत धर्म भिन्न असले तरी त्यांची एकमेकांशी वर्तणूक प्रेमाची आहे.

गोमंतकातले लोक कलाप्रेमी आहेत. गायन, नृत्य, वाद्यवादन, चित्रकला या कलांतील त्यांची प्रगती अतिशय चांगली आहे. गोवेकरांची सौंदर्यासक्ती अनुपम आहे. परकी अमलामुळे मात्र या सर्व गुणांचे व्हावे असे चीज झाले नव्हते.

गोव्यातील लोक ‘ कोकणी ’ बोली बोलतात. कोकणी मोठी मधुर आहे. कोकणी ही मराठीची एक बोली आहे. दोहींत कांही फारसा फरक नाही. कोकणीवर पोर्तुगीज भाषेचा परिणाम झालेला आहे. कोकणी भाषा देवनागरी, रोमन व कानडी अशा तिन्ही लीपींत लिहिली जाते. कोकणीबरोबरच मराठी भाषेचा वापरही मोठ्या प्रमाणात केला जातो. असा गोमंतक हा एक छोटा पण मोठा मनोवेधक प्रदेश आहे. हिंदभूमीचा तो एक नयनमनोहर अलंकार आहे.

□ □ □

३ : फिरंग्यांच्या आधीचा गोवा

□ □ □ □ □ □ □ □ □ □ □ □ □ □

गोव्यासंबंधी थोडीफार माहिती जुन्या पुराणांमध्ये मिळते. प्राचीन काळी गोवा विविध नावाने ओळखला जाई. गोमंतकाला गोमंत-गोपुरी, गोपकपूर, गोपकपट्टण इत्यादी नावे आहेत. ' गौ ' म्हणजे गाय; ' मंत ' म्हणजे युक्त किंवा भरलेला. गाईबैलांनी आणि त्यांच्या खिल्लारांनी भरलेला प्रदेश. यावरून त्यास वरील नावे पडली असावीत.

स्कंध पुराणातील सह्याद्रिकांडातही गोमंतकासंबंधी उल्लेख आहेत. आपल्या पराक्रमाने एकवीस वेळा निःक्षत्रिय पृथ्वी करणाऱ्या परशुरामाने यज्ञभूमी म्हणून गोमंतकाची निवड केली. त्याने प्रयत्नपूर्वक समुद्र मागे हटविला, वसाहतीस योग्य अशी जमीन तयार केली. नंतर मिथिला किंवा त्रिहोत्रपूर येथून आर्यांची काही कुले गोमंतकात नेऊन त्यांची परशुरामाने तिथे वसाहत केली; तेथे मोठमोठे यज्ञ केले. यज्ञाच्या भस्माचे मोठमोठे डोंगर झाले.

या भागात गोमासुर नावाचा राक्षस होऊन गेला. त्याच्या वधानंतर तो राहात असलेल्या प्रदेशाला गोमंतक असे नाव मिळाले, अशीही एक दंतकथा आहे.

गोवा हा पहिल्यापासूनच निसर्गसंपन्न प्रदेश आहे. त्यामुळे तप करू इच्छिणाऱ्या ऋषींची मने त्याने आकृष्ट न केली तर नवलच! असे सांगतात की याच प्रदेशात गौतम ऋषी तपश्चर्येसाठी राहात. त्यांच्या-बरोबर इतर ऋषीही तपःसाधनेस येथे राहात. गौतमांच्या या तपोभूमीस 'गोमंतक' नाव मिळाले. महाभारताच्या भीष्मपर्वातही गोव्याचे उल्लेख आहेत.

इसवी सनाच्या पूर्वी दोनशे वर्षांपासून गोमंतकावर सातवाहन, कदंब, चालुक्य, राष्ट्रकूट या राजघराण्यांची सत्ता होती. त्यासंबंधीचे उल्लेख शिलालेख, ताम्रपट, दानपत्रे यांमधून सापडतात. कदंब राजघराण्याच्या काळात गोव्यात स्थिर राज्यव्यवस्था होती. आर्थिक सुबत्ता असून प्रजा सुखात होत. कदंबराजे पराक्रमी होते. ते नाणी पाडीत, रथामधून युद्धास जात. त्यांच्या रथावरील निशाणावर वानराचे चित्र असे. ते स्वतःला चक्रवर्ती राजे म्हणवीत, नंतरचे कदंब राजे दुबळे झाले आणि गोव्याचे राज्य यादवांचे मांडलिक राज्य म्हणून मानले जाऊ लागले. देवगिरीचे रामदेवराव यादव स्वतःस 'कदंबरायस्थापनाचार्य' असे म्हणवीत असत. रामदेवराव यादवांच्या कारकीर्दीत गोव्याची विद्या आणि कला यांमध्ये खूपच प्रगती झाली.

याच सुमारास उत्तरेकडून मुसलमानांच्या स्वाऱ्या देवगिरीवर झाल्या. त्या स्वाऱ्यांनी देवगिरीच्या यादवांचे राज्यवैभव धुळीस मिळविले. संपत्ति आणि सत्ता यांची चटक लागलेल्या सुलतानांनी यादवांची सत्ता संपुष्टात आणून येथे मुसलमानी राज्य स्थापन केले.

इसवी सन १३१२ च्या सुमारास गोव्यावर मुसलमानांचा अंमल सुरू झाला, मलीक काफूर याने गोव्याचे राज्य आपल्या ताब्यात घेतले. मुसलमानांची सत्ता विजयनगरच्या राजांनी संपविली. विजयनगरच्या पराक्रमी राजांनी गोव्यामधून मुसलमानांची हकालपट्टी केली. पण

विजयनगरचे साम्राज्य बुडाल्यानंतर बहामनी राजांनी गोव्यावर आपली सत्ता स्थापन केली. महमद गवानाने गोवे जिंकले. गोव्यावरील स्वारीत, जय मिळाल्यामुळे बहामनी राजांनी दहा दिवस विजय महोत्सव साजरा केला.

बहामनी राज्याचे पुढे पाच तुकडे झाले. युसफ आदिलशाहाने इ. स. १४८९च्या सुमारास गोवा आदिलशाही मुलखास जोडले. बादशाहाने स्थानिक हिंदूंना हाताशीं धरून गोव्याचा कारभार चालविला. हिंदू प्रजेला खूष ठेवण्याचा त्याने प्रयत्न केला. गोव्याचा रम्य प्रदेश आवडल्यामुळे त्या भागात बादशाहाने स्वतःसाठी राजवाडे बांधविले.

राजकीय उलाढालींच्यामुळे प्रजेवर अत्याचार झाले. बऱ्याच वेळा त्यांना लुटालूट, जुलूम यांना तोंड द्यावे लागले.

गोव्याच्या आजूबाजूस पसरलेल्या महाराष्ट्राची छत्रपती शिवाजी महाराजांनी मुक्तता केली. प्रतिपदेच्या चंद्राप्रमाणे उदयास आलेले स्वराज्य वाढत वाढत खूप मोठे झाले. गोमंतक मात्र फिरंग्यांच्या टाचेखाली पिचत राहिला !

□ □ □

४ : पोर्तुगीज गोवा गिळतात

□ □ □ □ □ □ □ □ □ □ □ □ □ □

वास्को-डी-गामा हिंदुस्थानातून यशस्वी सफर करून आल्यामुळे पोर्तुगालमध्ये मोठा आनंदोत्सव झाला. नवीन संधीचा फायदा घेण्यासाठी पोर्तुगालच्या राजाने इ. सन १५०० मध्ये हिंदुस्थानवर दुसरी मोहीम उघडली. त्याने पेद्रो अल्वारीस काब्राल याच्या नेतृत्वाखाली एक आरमारी तुकडी रवाना केली. या तुकडीत तीस जहाजे व बाराशे शिपाई होते. वाटेत त्यांना प्रतिकूल हवामान व अरब चाचे यांना तोंड द्यावे लागले. कालिकतच्या झामोरीनशी काब्राल याने चांगलेच संधान बांधले. कालिकत येथे त्याने व्यापारी वखार उघडली. त्या काळी मुसलमान व्यापाऱ्यांची चांगली चलती होती. या मुसलमान व्यापाऱ्यांचे व काब्रालचे खटके उडाले. शेवटी काब्रालची कालिकतहून पिछेहाट झाली. त्याने आपला मोर्चा कोचीन, कान्नानूर, क्विलोन या बंदरांकडे वळविला.

त्या ठिकाणी आपली थोडी शिबंदी ठेवून तो पोर्तुगालला परत गेला.

त्याच्या पाठोपाठ इ. स. १५०२ मध्ये वास्को–डी–गामा दुसऱ्यांदा हिंदुस्थानात आला. त्याच्याबरोबर चाळीस आरमारी जहाजांची तुकडी होती. त्याने कोचीनच्या व कान्नानूरच्या स्थानिक राजाशी मैत्री केली. मुसलमान अरब व्यापाऱ्यांच्या विरुद्ध मदत न करणाऱ्या कालिकतच्या झामोरीनचा त्यास राग आला होता. त्याने झामोरीनच्या थोबाडीत मारली! वास्को–डी–गामाच्या ह्या उद्धट वागण्याने एतद्देशीय राजांच्या दरबारांना हादरा बसला.

पोर्तुगॉलहून येणाऱ्यांचे नेतृत्व पोर्तुगालच्या आरमारी अधिकाऱ्यांच्या-कडे असे. काब्राल हा पोर्तुगीज नौदलातील अधिकारी होता. त्याचे वागणे अधिकाऱ्याच्या तोऱ्यातील असे. साहसी प्रवाशांच्या किंवा व्यापाऱ्यांच्यासारखी मृदुता त्याच्या वागण्यात नसे.

इ. सन १५०५ च्या सुमारास फ्रान्सिस अल्मीडा आला. मुसलमान व्यापाऱ्यांची पीछेहाट करण्यासाठी हिंदुस्थानात मजबूत किल्ले बांधून त्यावर चांगली शिबंदी ठेवली पाहिजे, ही गोष्ट त्याने आपल्या देश-बांधवांच्या मनावर ठसविली. अल्मीडा परत गेला. त्याच्या जागी अल्बुकर्क याची गव्हर्नर म्हणूनच नेमणूक झाली. कालिकतचा पाडाव करण्याचा त्याला खास हुकूम मिळाला होता. त्याने जानेवारी १५१०त कालिकतवर हल्ला चढविला. पण तेथे त्याला अपयशच स्वीकारावे लागले.

गोमंतकात या वेळी आदिलशाही अंमल होता. आदिलशाहाच्या जुलमी राजाला तेथील हिंदू प्रजा कंटाळलेली होता. त्यातील कांहींनी आपले गाऱ्हाणे होनावरच्या हिंदू राजापुढे मांडले व आदिलशाही जुलुमातून सुटका करविण्याची होनावरच्या राजास विनंती केली.

होनावरच्या आरमारावर तिमोजा किंवा तिमय्या हा अधिकारी होता. त्याने पोर्तुगिजांची मदत गोवा सर करण्यासाठी मागितली. पोर्तुगीज गव्हर्नर अल्बुकर्क याने त्यास आनंदाने मान्यता देऊन आपले आरमार तिमोजाच्या मदतीस धाडले. तिमोजा व पोर्तुगीज यांच्या मोठ्या आरमारास भिऊन गोव्याचे आदिलशाही अधिकारी पळून गेले. अल्बुकर्क याचा एक अधिकारी नोरोन्हा याने पणजीवर हल्ला करून ते ठाणे घेतले. दि. ४ मार्च इसवी सन १५१० रोजी गोवा पोर्तुगीजांच्या ताब्यात आले. किल्ल्यामध्ये त्यांना बराच दारूगोळा, शस्त्रे, घोडे मिळाले. विजापूरच्या आरमाराची सुमारे चाळीस जहाजे मिळाली.

अल्बुकर्कने किल्ल्याचा बंदोबस्त आणि डागडुजी केली. धान्यासाठी त्याने मुद्दाम कोठारे बांधली. गोव्यात स्वारीचे आमंत्रण देणाऱ्या तिमोजाशी त्याने मैत्री राखली. एवढेच नव्हे तर त्याचा सत्कार करून काही जमिनीचे उत्पन्न त्याला देऊन पोर्तुगालच्या राजाच्या नावाने अल्बुकर्क गोव्याची व्यवस्था पाहू लागला. त्याने सोने, चांदी व तांबे यांची नाणी टांकसाळीत पाडून ती उपयोगात आणली. कर बसवून उत्पन्न गोळा केले. किल्ल्याची डागडुजी केली.

हे सर्व करीत असताना काही वेळा त्याला त्याच्या हातांखालील सरदारांकडून विरोध झाला. त्याच्याविरुद्ध सैनिकांनी कट केले. पण ते उघडकीस आणून अल्बुकर्कने त्यांचा बंदोबस्त केला. गोव्याचा जिंकलेला प्रदेश आपलासा करण्याचा आपला कार्यक्रम चालू ठेवला.

गोवा इतका सहजासहजी पचनी पडणे शक्य नाही, याबद्दल त्याची खात्री होती, थोड्याच दिवसांत आदिलशाही सैन्याने गोवा परत मिळविण्याची मोहीम काढली. त्यात काही आदिलशाही तुकड्यांचा पराभव झाला तर काही वेळा अल्बुकर्क यास गोव्यात राहणे अशक्य झाले. आदिलशाही सैन्याबरोबर त्याचे निकराचे युद्ध झाले. रणांगणावर आणि

रस्त्यावर प्रेतांचे ढीग पडले. अल्बुकर्क यास माघार घ्यावी लागली. गोवा सोडताना त्याने मुसलमानांची कत्तल केली. आरमार व सैनिक घेऊन त्याने दि. २० मे सन १५१० रोजी गोव्याचा प्रदेश सोडला. गोवा सोडताना त्यास फार दुःख झाले.

अल्बुकर्कने पोर्तुगालच्या राजास एक खलिता पाठविला. त्यात त्याने लिहिले, " हिंदुस्थानात पोर्तुगीज सत्ता आणि व्यापार स्थापण्यासाठी ' गोवा ' अत्यंत उपयुक्त असे ठिकाण आहे. गोवा बंदर हे उत्तम बंदर असून बाराही महिने जहाजे इथे आश्र य घेऊ शकतील. येथे वादळी वाऱ्यापासून जहाजांना मुळीच धोका होणार नाही. गोव्याची प्रजा श्रीमंत आहे. येथील व्यापार किफायतशीर आहे. येथे जहाजे बांधणारे कुशल कारागीर आहेत. त्या कुशल कारागिरांनी बांधलेली जहाजे शत्रूच्या हातात पडली तर आपणास खूप त्रास होईल. गोवा जर आपले हातात आले तर दक्षिण हिंदुस्थान ताब्यात ठेवणे सोपे जाईल आणि समुद्रावर आपला वचक राहील. " हे सर्व लिहून गोवा परत जिंकण्यासाठी त्याने पोर्तुगालच्या राजाकडे सैन्याची, आरमाराची मदत मागितली. ती त्यास मिळाली.

मदत येताच अल्बुकर्कने गोव्यावर जोराची चढाई केली. पोर्तुगीज सैन्याजवळ चागल्या तऱ्हेच्या तोफा आणि बंदुका होत्या, त्यांची शिस्त वाखाणण्यासारखी होती. त्यांच्यापुढे आदिलशाही फौजांचा टिकाव लागू शकला नाही. त्यांनी शिकस्तीने लढा दिला. पण शेवटी त्यांचा पराभव झाला. गोव्याचा किल्ला पोर्तुगीजांच्या हाती पडला. त्यांनी किल्ल्याचा बंदोबस्त करून शहर लुटले, त्या लुटीत काही तोफा व भरपूर दारूगोळाही पोतुगीजांच्या हाती लागला, गोव्याची मोहीम यशस्वी झाल्याने अल्बुकर्क यास समाधान वाटले. गोव्याचे संरक्षण व्हावे यासाठी शहराभोवती तटबंदी बांधण्याचे त्याने ठरविले. चुन्याच्या

भट्टया लावून चुन्याचे उत्पन्न वाढविले. मुसलमानांची थडगी उकरून त्यातील दगड तटबंदीला वापरले. शिबंदी मजबूत केली.

पोर्तुगाळहून आलेले सैनिक परत जाण्यास उत्सुक असत. अल्बुकर्कने सैनिकांना येथील स्त्रियांबरोबर लग्ने करण्याची परवानगी दिली. त्याने जे सैनिक लग्ने करतील त्यांना येथील जमिनी आणि घरे बक्षीस दिली. यामुळे सैनिकांचा पोर्तुगालला परत जाण्याचा ओढा कमी झाला. अशा प्रकारे येथे मिश्र संस्कृती जन्माला आली.

व्यापारी जहाजांना त्याने संरक्षण दिले. व्यापाऱ्यांना अनेक सवलती देऊ केल्या. पोर्तुगीज नाण्यांचा व्यवहारात वापर सुरू केला. त्याच्या खटपटीमुळे गोव्यात पोर्तुगीज सत्ता स्थिरावली.

गोव्यात पाय रोवल्यावर पोर्तुगीजांनी बाजूबाजूच्या प्रदेशात हातपाय पसरण्यास सुरुवात केली. इ. सन १५३४ च्या सुमारास त्यांनी मुंबई, साष्टी, वसई, वांद्रे व त्या भोवतालचा प्रदेश गुजराथच्या सुभेदाराकडून मिळविला. थोडयाच दिवसांत इ. सन १५३५ मध्ये त्यांनी काठेवाडातील दीव बेट घेऊन त्यावर किल्ला बांधून तेथे आपली शिबंदी ठेवली. तीनचार वर्षांत त्यांनी गुजरातेतील दमण घेऊन तेथेही किल्ला बांधून शिबंदी ठेवली.

व्यापार व राजकीय सत्ता नीटनेटकी हातात राहावी या हेतूने निरनिराळ्या बंदरांत सैन्य व आरामाराची ठाणी पोर्तुगीजांनी स्थापन केली.

हिंदुस्थानातील पश्चिम किनाऱ्यावर पोर्तुगीज सत्तेने आपला पाय भक्कम रोवला. हिंदुस्थानचा जलमार्ग शोधणारा वास्को-डी-गामा इ. सन १५२४ साली हिंदुस्थानात तिसऱ्यांदा आला. गोव्यात पोर्तुगीज सत्तेची स्थापना करण्याचे मुख्य श्रेय अल्बुकर्क याला आहे. त्याच्या मृत्यूनंतर त्याच्या कामगिरीचे महत्त्व पोर्तुगालला पटले. त्याची ' अल्बुकर्क दी ग्रेट ' म्हणून प्रसिद्धी झाली. □ □ □



५ : दीव, दमण, नगरहवेली आणि अंजदीव

□ □ □ □ □ □ □ □ □ □ □ □ □ □

गोव्याबरोबरच हिंदुस्थानात पोर्तुगिजांनी दीव, दमण आणि अंजदीव बेटांवरही आपला अंमल बसविला.

दीव काठेवाडात समुद्रकिनाऱ्यावर वसले आहे. या छोटया पोर्तुगीज वसाहतीची लांबी अंदाजे सात मैल असून रुंदी अंदाजे अडीच ते तीन मैल आहे. एकूण क्षेत्रफळ सुमारे वीस चौरस मैलांचे आहे. दीवचा किनारा दंतुर असून किनाऱ्यावर नारळाची झाडी आहे. या झाडांनी किनाऱ्याचे दृश्य मोठे सुरेख दिसते.

दीवचे हवामान कोरडे आहे. समुद्रसान्निध्यामुळे हवा खारी आहे. येथील बहुतेक जमीन उजाड, नापीक आहे. पाण्याची खूपच टंचाई असते. नापीक जमीन आणि पाण्याचा तुडवडा यामुळे शेतीकडे दुर्लक्षच झाले आहे. जी थोडी जमीन लागवडीखाली आहे तिच्यात ज्वारी, बाजरी, नाचणी ही पिके होतात, नारळाचे उत्पन्नही चांगले येते. दीव हे चांगले बंदर आहे. नांगर टाकून किनाऱ्यावर आगबोटी थांबू शकतात. एके काळी दीव बंदर फार प्रख्यात होते. तेथून अरबस्तान आणि इराण यांच्याशी व्यापार चालत असे. युरोपातही येथून चांगला

व्यापार चालत असे. त्या काळी दीवची लोकसंख्या चांगली पन्नास हजार होती, असे म्हणतात.

दीवच्या शिवाय वसाहतीमध्ये मोना कोबारा, विचवारा आणि नगावा अशी तीन गावे आहेत. येथील लोक विणकराचा धंदा करतात. दीवचे किंमती कापड एके काळी परदेशात खूप वाखाणले जात असे. विणकामाबरोबरच मासेमारीचा धंदाही मोठ्या प्रमाणात चालतो. येथील काही धाडसी व्यापाऱ्यांनी आफ्रिकेतील पोर्तुगीज वसाहतीत व्यापारात चांगलाच जम बसविलेला आहे. दीवला पोर्तुगीजांनी बांधलेला किल्ला चांगल्या स्थितीत आहे.

पोर्तुगिजांनी दीव गुजरातच्या बहादूरशहाकडून घेतले. अनेक लढे देऊन त्यांनी आपली सत्ता कायम ठेवली. इसवी सन १६७० मध्ये अरबांनी दीववर हल्ला करून ते लुटले. नंतर मात्र दीवमध्ये काही विशेष घटना घडली नाही.

पोर्तुगीजांची दुसरी वसाहत दमण. दमण ठाणे जिल्ह्यात समुद्र-किनाऱ्यावर आहे. दमणचे क्षेत्रफळ सुमारे दीडशे चौरस मैलांचे आहे. दमणच्या भागात भगवान, कालेम व दमणगंगा ह्या तीन नद्या वाहतात. नद्यांच्या मुखातून वाहतूक चालते. दमण बंदर चांगले आहे. मोठमोठ्या आगबोटी नांगर टाकून थांबू शकतात. दमणहून एके काळी परदेशांशी चांगला व्यापार चालत असे. येथे जहाजे बांधणीचा धंदा चालत असे.

दमणच्या आजूबाजूची जमीन सुपीक आहे. येथे तांदूळ, गहू व तंबाखू यांचे उत्पन्न येते. येथे विणकामाचा धंदा चालतो. काही माल परदेशात जातो. तेथे त्यास चांगली किंमत येते. लोक मच्छीमारीचा आणि मासळी खारवण्याचा धंदा चालतो.

दमणगंगेच्या दोनही तीरांवर दोन किल्ले आहेत. त्यांचा आकार चौकोनी असून ते दगडांनी बांधलेले आहेत. किल्ल्याच्या तटांवर जुन्या

पितळी तोफा अजूनही बसविलेल्या आहेत. दमणच्या प्रदेशावर चौथाई वसूल करण्याचा हक्क पोर्तुगीजांनी मराठ्यांना दिला होता.

दमणजवळच नगरहवेली परगणा आहे. नगरहवेली हा भाग सर्व बाजूंनी भारतीय प्रदेशाने वेढलेला आहे. नगर हवेलीच्या प्रदेशात उत्तम जंगल आहे. त्या जंगलात सागवान, खैर, शिसव, तिवस, शिवण, बाभूळ इत्यादी अनेक जातींची झाडे आहेत. सागाची झाडे निम्म्यापेक्षा जास्त जंगलात असून येथील सागवान उत्तम प्रतीचे आहे. नगरहवेलीचा प्रदेश सदोदित हिरण्यागार वृक्षराजींनी वेढलेला असतो. येथील शोभा अवर्णनीय आहे. येथील लोकवस्ती आदिवासी, वारली यांची आहे. लोक कष्टाळू आहेत. परिस्थितीने ते मागासलेले आहेत. वारली समाजातील नृत्य आकर्षक असते. वारली शेतीभातीही करतात. दि. ७ जानेवारी १७८० त मराठ्यांनी नगरहवेली पोर्तुगिजांना दिली.

नगरहवेली परगणा सर्व बाजूंनी भारतीय प्रदेशाने वेढलेला आहे. पोर्तुगीजांच्या गुलामगिरीतून सुटका करून घेण्याचा अभिनव प्रयोग येथील रहिवाशांनी केला. गोमंतकीय क्रांतिकारकांनी उठाव करून नगरहवेलीचा ताबा घेतला. तेथील पोतुगीज अधिकाऱ्यांना त्यांनी कैद केले.

नगरहवेलीतील स्वातंत्र्याचा हा उठाव मोडून काढण्यासाठी तेथे सैन्य पाठविण्याची पोर्तुगीजांनी तयारी केली. भारताने सैन्य नेण्यास परवानगी नाकारली. पोर्तुगालने भारताविरुद्ध आंतरराष्ट्रीय कोर्टात याबद्दल दाद मागितली. भारतातर्फे न्यायमूर्ती छगला यांनी बाजू मांडली. त्यांनी अनेक जुने कागदपत्र, करारपत्र, आंतरराष्ट्रीय दाखले देऊन पोर्तुगालचा दावा खोडून काढला. न्या. छगलांनी मांडलेली भारताची बाजू न्यायालयास पटली. न्यायालयाने पोर्तुगालचा भारतीय हद्दीतून

भारताच्या अनुमतीशिवाय सैन्य पाठविण्याचा हक्क अमान्य केला. नगर-हवेली परगण्याने पोर्तुगालच्या जोखडातून सुटका करून घेण्यात आघाडी मारली. राष्ट्रपतींनी तेथे आपला अंमल बसविला. नगरहवेली केंद्रशासित प्रदेश झाला.

कारवारच्या पश्चिमेस सुमारे पाच मैलांवर अंजदीव बेट आहे. अंजदीव हे छोटे चिंचोळे बेट आहे. त्याचे क्षेत्रफळ फक्त अर्धा चौरस मैलाइतकेच आहे. बेट ओसाड आहे. नारळीची झाडी सोडली तर येथे दुसरे काही होत नाही. बेटाच्या पूर्वेस धक्का आहे. तेथे हजार टनी बोटी थांबू शकतात.

अंजदीव बेटाचा संबंध मारुतीची आई अंजनी हिच्या नावाशीही कोणी जोडतात. अंजनीच्या नावावरून अंजदीव हे नाव पडले असावे.

महंमद तुघलखाच्या काळात भारतात आलेला इब्न बतूना यानेही या बेटाचा उल्लेख आपल्या लेखनात केला आहे. तो स्वतः इ. स. १३४२ त अंजदीवला गेला होता. अरब व्यापारीही अंजदीवचा उपयोग करीत असत. विजयनगरच्या हिंदू राजांनी आपले काही सैन्य थोडे दिवस येथे ठेवले होते.

इसवी सन १४९८ मध्ये वास्को–डी–गामानेही अंजदीव बेटाला भेट दिली. इ. स. १५०५ च्या सुमारास पोर्तुगीजांनी अंजदीववर गढी उभारली. संभाजी महाराजांनी अंजदीववर तटबंदी करण्याचा प्रयत्न केला. पण पोर्तुगीजांनी तो यशस्वी होऊ दिला नाही. येथे शेकडो वर्षे पोर्तुगीजांनी आपला अंमल मात्र कायम ठेवला. भारताच्या किनाऱ्याच्या रक्षणासाठी नौदलाचे ठाणे म्हणून अंजदीवचे महत्त्व अनन्य-साधारण आहे.

□ □ □

६ : धार्मिक अत्याचार

□ □ □ □ □ □ □ □ □ □ □ □ □ □

चौदाव्या शतकात पोर्तुगीज खलाशांनी भारताचा जलमार्ग शोधून त्या काळी फार मोठा पराक्रम केला. युरोपभर या गोष्टीचे फार कौतुक झाले. धर्मगुरू पोप अलेक्झांडर यांनी पोर्तुगालच्या राजाचे अभिनंदन करून त्यांना सन्मानाच्या पदव्या दिल्या. 'दर्यावर्दीचे प्रभू' 'इथोपिया, अरेबिया, पर्शिया व हिंदुस्थान यांच्या व्यापाराचे विजेते' ही पोप महाराजांनी दिलेली बिरुदे आपल्या नावापुढे लावण्यात पोर्तुगालच्या राजांना फार अभिमान वाटत असे.

व्यपाराच्या मुख्य हेतूने जरी पोर्तुगिज हिंदुस्थानात आले, तरी व्यापाराबरोबरच त्यांचे धार्मिक वेडही हिंदुस्थानात आले. ते ख्रिस्ती धर्मानुयायी होते. ख्रिस्ती धर्मानुयायी तेवढे चांगले, इतर सर्व पापी;

अशी त्यांची समजूत होती. धर्मप्रसार करण्यासाठी त्यांना राजाकडून प्रोत्साहन मिळत असे.

इ. सन १५४०–४१ च्या सुमारास पोर्तुगालमध्ये तिसरा ‘दो जुवांव’ हा राजा राज्यावर आला. त्याने धर्मप्रसार करण्यासाठी बिशप झेविअर यास हिंदुस्थानात मुद्दाम पाठविले. त्याला सर्व तऱ्हेचे साहाय्य देण्याविषयी येथील अधिकाऱ्यांना हुकूम देण्यात आले.

सत्ता हातात असल्याने जुलूम करून धर्मप्रसाराचे प्रयोग सुरू झाले. त्या प्रयोगांनी प्रजा त्रस्त झाली. आजही त्या हकीगती भयंकर अशा वाटतात.

दिनाक ३० जून १५४१ मध्ये गोव्यात पोर्तुगीजांनी एक आज्ञापत्र काढले. ते असे :— आकाशातील देवाने हिंदूंची सर्व देवालये जमीनदोस्त करण्याची आम्हांला आज्ञा केली आहे. ” त्यास अनुसरून बरीच देवालये पाडण्यात आली. त्यातील मूर्तींची फोडतोड झाली पाडलेल्या देवळाच्या सामानामधून नवी चर्चे बांधण्यात आली. हिंदूंच्या धार्मिक उत्सवांना बंदी घालण्यात आली.

जे हिंदू ख्रिस्ती झाले नाहीत त्यांच्यावर धार्मिक कर बसविण्यात आला. औरंगजेब बादशहाने हिंदूंवर बसविलेल्या ‘जेझीया’ पट्टी-सारखाच हा कर असे. तो सक्तीने वसूल करण्यात येत असे. शेंडी ठेवण्यासाठी आठ रुपये कर पडे !

हिंदू घरातील गृहस्थ वारला असता त्याच्या बायकामुलांवर ख्रिस्ती होण्याची सक्ती करण्यात येई. त्यांनी ख्रिस्ती धर्म स्वीकारला तरच त्यांना त्यांची वडिलोपार्जित मालमत्ता मिळत असे. त्यांनी ख्रिस्ती धर्म स्वीकारण्याचे नाकारले, तर मालमत्ता सरकारजमा होई. मुले माणसे रस्त्यावर उघडी पडत.

हिंदूंचे धर्मरक्षण ब्राह्मण करीत. पोर्तुगीजांनी ब्राह्मणांच्या विरुद्ध

आघडीच उघाडली. त्यांना गोव्यात राहणे अशक्य करण्यात आले. अनेकांना हाकलून देण्यात आले. हिंदू पंडितांना आणि वैद्यांना पालखीत आणि घोड्यावर बसण्यास बंदी करण्यात आली. या बंदीविरुद्ध कोणी वागले तर त्यांना दंडाची शिक्षा होऊ लागली. ब्राह्मणांना हद्दपार केले तरी लोक पोथ्यापुस्तकांच्या साहाय्याने आपल्या धार्मिक बाबी साजऱ्या करीत. ही गोष्ट लक्षात आल्यावर पोर्तुगिजांनी धार्मिक पोथ्यांविरुद्ध मोहीम सुरू केली. पोथ्यापुस्तके शोधून काढून ती जाळून टाकण्याचा त्यांनी सपाटा लावला.

खिरस्ती धर्मात निरनिराळे धर्मपंथ आहेत. त्यातील जेसुईट हा फार कडवा धर्मपंथ त्या पंथाचे पाद्रीही अतिशय कडवे असत. बॉरेट नावाच्या धर्मोपदेशकाने तर कमालच केली. तो रस्त्याने निघाला की वाटेने भेटणाऱ्या सर्वांना बाप्तिस्मा देत देत पुढे जाई. बाजारहाट करण्यासाठी व व्यापारासाठी पेठेत येणाऱ्यांना पकडून बाटविण्यात येई.

हिंदू धर्मियांच्या धर्मविषयक भावना फार कट्टर असत. खिरस्ती माणसाच्या स्पर्शाचे अन्नपाणी चुकून घेतले, तरी घेणारास ते बाजूस टाकीत, वाळीत टाकीत. तो बाटला असेच ते समजत. ह्या भोळ्या समजुतीचा फायदा पाद्री लोकांनी घेतला. रात्रीच्या वेळी पावाचा एक तुकडा ते खेडेगावच्या विहिरीत टाकून देत. सकाळी गावातील बाया-बापड्या व इतर लोक त्या विहिरीचे पाणी नित्याप्रमाणे भरीत. यानंतर सांगण्यात येई की, त्या विहिरीतले पाणीं ‘ बाटलेले ’ होते व बाटलेले पाणी पिणारेही आता बाटले आहेत. अशी शेकडो गावेची गावे अज्ञानाने ‘ खिरस्ती ’ झाली ! त्यांना आपला भोळेपणा कोणी समजावून दिला नाही किंवा त्यांची ‘ पाणी पिण्या’च्या पापांतून सुटकाही कोणी केली नाही.

गव्हर्नर अल्बुकर्क याने पोर्तुगीज खिरस्ती सैनिकांची लग्ने स्थानिक हिंदू-

मुसलमान स्त्रियांबरोबर लावून दिली. त्याने अशा लग्नांचे सामुदायिक समारंभ केले. नव दांपत्यांना घरे, जमिनी देऊन त्यांची पक्की वसाहत करायला त्याने मदत केली.

पोर्तुगीज सरकारने वेळोवेळी काढलेल्या जाहीरनाम्यातील काही नमुने असे आहेत : इसवी सन १५५९ मधील आज्ञा पहा :

" गोवे आणि त्याच्या जवळची बेटे यातील घरात वा बाहेर देवळे व मूर्ती असतील त्या जाळून उध्वस्त कराव्या. जाहीर रीतीने उत्सव करू नये. कोणाच्या घरात देऊळ व मूर्ती असल्यास सरकारात वर्दी द्यावी. त्या घरमालकाची मिळकत जप्त करून टाकावी. जप्त केलेल्या मिळकतीचा अर्धा भाग देवळाची माहिती देणारास देण्यात यावा."

इसवी सन १५६३ मधील एक आज्ञा :

"...जमीन पिकविणारे शेतकरी, वैद्य, सुतार, लोहार भंडारी याखेरीज इतर हिंदूंनी आपली घरे व जमिनी विकून एक महिन्यात निघून जावे. ते तसे गेले नाहीत तर त्यांना पकडून गुलाम म्हणून पाठविले जाईल व त्यांची मालमत्ता जप्त होईल ! "

इसवी सन १५४२ मध्ये सेंट फ्रॅन्सिस झेवियर नावाचा पाद्री गोव्याचा बिशप म्हणून आला. त्याने सक्तीने लोकांना बाटविण्याचा सपाटा चालविला. त्याच्याच प्रेरणेने धार्मिक न्यायालयांची स्थापना झाली. ख्रिस्ती धर्म न स्वीकारणारा इसम पापी ठरला जाऊ लागला. अशा पाप्यांना शारीरिक पीडा देऊन आसन्नमरण करण्याची, प्रसंगी जिवंत जाळण्याची शिक्षा होऊ लागली. अशा न्यायालयाने सुमारे १४५० लोकांना जिवंत जाळले ! सुमारे १७००-१८०० लोकांना क्रूर शिक्षा झाल्या. सुमारे ६०,००० लोक छळाला कंटाळून ख्रिस्ती झाले. बरेच लोक छळाला कंटाळून आपआपल्या देवता व नेता येईल ती जंगम मालमत्ता घेऊन मुलूख सोडून परागंदा झाले. अनेक देवताही

पुजाऱ्यांच्या बरोबर शेजारच्या मुलखात पळून गेल्या, देवतांच्या अभावी त्यांचे भक्तही पोरके झाले असल्यास नवल नाही !

अत्याचारी मार्गाबरोबरच ज्ञानप्रसाराचा मार्गही पाद्री लोकांनी अवलंबिला. त्यांनी युरोपातून छापखाने आणून खिरस्ती धर्माची माहिती देणारी पुस्तके, बायबल आदी ग्रंथ छापून लोकांना वाटले व त्यांच्यात धर्मप्रसार केला. हिंदू लोक पुराणे वाचतात. पुराणातील विचारांचा लोकांच्यावर खूप परिणाम होतो; हे पाहून फादर स्टीफन्स यानें खिरस्त पुराण लिहिले. ते त्याने ओवीबद्ध मराठीत लिहिले आणि रोमन लिपीत छापले. फादर स्टीफन्स यांना मराठी भाषा व तिची कोकणी बोली या चांगल्या अवगत होत्या. मराठी भाषेवर त्यांचे प्रेमही होते. त्यामुळे खिरस्त पुराण बरेच सरस झाले आहे. मराठी भाषेबद्दल फादर स्टीफन्स खिरस्त पुराणात लिहितात :—

जैसी हरळामाजी रत्नकिळा ।
कीं रत्नामाजी हिरा निळा ।
तैशी भासामाजी चोखळा ।
भासा मराठीं ।। १ ।।

जैसी पुष्पामाजी पुष्प मोगरी !
कीं परिमळामाजी कस्तुरी ।
तैसी भासामाजी साजिरी
मराठिया ।। २ ।।

पक्षियांमध्ये मयोरू ।
वृक्षियांमध्ये कल्पतरु ।
भासांमध्ये मानू थोरु ।
मराठियेसी ।। ३ ।।

तारांमध्ये बारा रासी ।
सप्तवारांमध्ये रविससी ।
या द्विपीचे भासांमध्ये तैसी ।
बोली मराठिया ॥ ४ ॥

परमशास्त्र जगी प्रघटावेया ।
बहुतजनां फलसिद्धी होवावेया ।
भासा बांधोनि मराठिया ।
कथा निरोपिली ॥ ५ ॥

कान्हेरी, घारापुरी येथील लेण्यांमध्ये हिंदू देवतांच्या भव्य, सुंदर व अनेक शिल्पकृती होत्या. त्यांतील कला व कल्पकता लोकांचे मन आकृष्ट करीत. धर्मवेड्या पोर्तुगीजांनी लेण्यांतील अनेक मूर्तींचे नाक, कान, हात, पाय इत्यादी इंद्रिये फोडून त्या विद्रूप केल्या. तोफा उडवून काही लेणी उद्‌ध्वस्त केली. लेण्यांतील या छिन्नभिन्न मूर्ती आजही पोर्तुगीज धर्मवेड्यांच्या अत्याचारांची साक्ष देत आहे.

अशा अनेक प्रकारांनी भारतात धार्मिक जुल्म केला आणि पोर्तुगीजांनी धर्मप्रसार करून स्वतःस धन्य म्हणवून घेतले. ते सर्व अत्याचार सहन करून हिंदू धर्म टिकला हे आश्चर्य खरेच !

□ □ □

७ : गोवामुक्ततेचे छत्रपतींचे प्रयत्न

□ □ □ □ □ □ □ □ □ □ □ □ □ □

छत्रपती शिवाजी महाराजांच्या जन्माच्या आधी सुमारे चार-पाचशे वर्षें महाराष्ट्रात परक्यांचा अंमल पक्का झाला होता. उत्तरेकडून आलेल्या मुसलमानांनी येथील प्रांत घशाखाली घालून येथे लहानमोठी राज्ये स्थापिली होती. पश्चिम दिशेने समुद्रमार्गे आलेले पोर्तुगीज, डच, फ्रेंच, इंग्रज हेही आपली सत्ता पक्की करीत होते.

शेकडो वर्षांच्या मुसलमानी अमलामुळे प्रजा गांजून गेली होती. अत्याचारांनी चांगलीच होरपळून गेली होती. प्रजेत शौर्य होते, मुत्सद्देगिरी होती, विद्या होती, कला होती; पण ते सर्व गुण पादशाहांच्या दारी चाकरी बजावण्यात खर्च होत होते.

शिवाजी महाराजांनी काळाची पावले अचूक ओळखली. 'स्वत्वा'ची ओळख करून देत त्यांनी स्वराज्यस्थापनेचे मनसुबे रचले.

त्यांच्या सिद्धीसाठी अटोकाट परिश्रम केले. साधुसंतांनी या प्रयत्नांना आशीर्वाद दिले. मावळाच्या किंचित कोन्यात स्वराज्याची स्थापना झाली. प्रतिपदेच्या चंद्रकलेप्रमाणे ते वाढत चालले.

महाराज योजनाकुशल होते. त्यांनी देशरक्षणार्थ सैन्य दुर्गादी नवीनच बंध उत्पन्न केले. राज्याच्या लांबलचक किनाऱ्याच्या रक्षणासाठी नेमकी दृष्टी चालवून त्यांनी आरमार सिद्ध केले !

महाराजांच्या वाढत्या सामर्थ्याचा धसका दिल्लीच्या मोगलांना व विजापूरच्या आदिलशाहांना बसला. किनाऱ्यावरच्या बंदरावर ठाण मांडून बसलेल्या पोर्तुगीज, इंग्रज या परकीय सत्तांनाही शिवाजी महाराजांची भीती वाटे.

स्वराज्याच्या सरहद्दीवर गोव्याची पोर्तुगीज सत्ता महाराजांच्या मनाला झोंबत होती. तेथील हिंदू प्रजेवर होणारे धार्मिक अत्याचार ऐकून त्यांचे मन प्रक्षुब्ध होई. सन १६७५ च्या २६ नोव्हेंबरला लिहिलेल्या वृत्तान्तात रॉबर्ट ऑर्म लिहितात... " शिवाजी पोर्तुगीजांचेबद्दल रागात आहे. त्याच्या जातींच्या अनाथ मुलांना ते कॅथॉलिक धर्माची दीक्षा देतात म्हणून तो त्यांचा फार द्वेष करतो. " याशिवाय ही परकी मंडळी शिवाजीच्या शत्रूंना हत्यारे, तोफा, दारूगोळा, गोलंदाज, सुरुंगी यांची मदत करीत. इसवी सन १६६८ पर्यंत गोवा लढून घेण्यास महाराजांना उसंत मिळाली नाही. शिवाय गोव्याची मोहीम खर्चाचीही होती.

पोर्तुगीज आणि शिवाजी यांच्या मध्यावर छोटे छोटे जमीनदार होते. त्यांना देसाई म्हणत. ह्या देसायांची सत्ता पाच पाच दहा दहा गावांत चालत असे. या साऱ्या देसायांना स्वराज्यात सामील करावे, या हेतूने इसवी सन १६६८ मध्ये बरोबर दहा-बारा हजार पायदळ, एक हजार घोडेस्वार घेऊन शिवाजी महाराज स्वारीसाठी कोकणात

उतरले. कुडाळ प्रांतातून त्यांनी मतग्रामच्या देसाग्रावर स्वारी केली. देसायांची घाबरगुंडी उडाली. तो आग्वादजवळ पोर्तुगीजांच्या आश्रयास गेला. त्याचा पाठलाग करीत महाराजांची फौज पोर्तुगीज मुलुखांत घुसली. त्या मुलुखातील गावे मराठी फौजेने जाळून लुटून फस्त केली.

मराठी फौज आपल्या मुलुखात घुसलेली पाहून गोव्याच्या व्हाइसरॉयने आपला वकील महाराजांच्याकडे पाठविला. वकिलाने महाराजांना चढाई थांबविण्याची विनंती केली. महाराजांनी ' देसायांना ' साहाय्य न करण्याबद्दल अट घातली. ती पोर्तुगीजांनी कबूल करून देसायांना आपल्या मुलुखातून बाहेर जाण्यास भाग पाडले. पोर्तुगीजांबरोबरची लढाई थांबली.

देसायांच्या मुलुखामधील नार्वे गावी श्रीसप्तकोटीश्वराचे जुने देवस्थान होते. पोर्तुगीजांनी ते शिवमंदिर उद्ध्वस्त केले. देवळातील शिवलिंग एका विहिरीवर बसविले होते. छत्रपतींनी सप्तकोटीश्वराचे मंदिर बांधण्याची आज्ञा दिली. याच सुमारास महाराजांनी गुप्तपणे आपले पाचसहाशे सैनिक गोव्यात पाठविले. आत शिरलेल्या सैनिकांच्या मदतीने उठाव करून करून गोव्यावर झडप घालण्याचा महाराजांचा बेत होता. परंतु गोव्याच्या व्हाइसरॉयच्या लक्षात हा प्रकार आला. त्याने या सैनिकांना अटक करून गोव्याबाहेर घालवून दिले. महाराजांच्या वकिलासही बोलावून त्याचा अपमान करून घालवून दिले. डाव फसला, उघडपणे गोव्याची मोहीम त्यावेळी कठीण आहे असे पाहून छत्रपतींनी ती तहकूब केली.

योजल्याप्रमाणे शिवालय बांधण्याचे काम पूर्ण झाले. देवालयाच्या प्रवेशद्वाराशी शिलालेख आहे.

श्रीसप्तकोटीश शके १५९० किलकाब्दे कार्तिक कृष्ण
पंचम्यां सोमे शिवराज्ञा देवालयस्य प्रारंभः

शिवाजी महाराजांशी पोर्तुगिजांचे धोरण सलोखा राखण्याचे होते. दोस्ती करण्यासाठी ते महाराजांशी पत्रव्यवहार करीत. मात्र त्यांचे धोरण दुटप्पी असे. ते शिवाजी महाराजांच्या शत्रूंशीही संधाने बांधीत असत. गोव्याच्या व्हाइसरॉयने लिहिलेली दोन पत्रे या गोष्टीची साक्ष देतील. इसवी सन १६६७ च्या एप्रिल १९ रोजी मिर्झा राजे जयसिंग यांना गोव्याचे व्हाइसरॉय लिहितातः

> " मराठ्यांच्या विरुद्ध मोंगलांशी गोव्याचे आरमार सहकार्य करील. मात्र युद्धाचा खर्च मोंगलांनी करावा. "

हेच व्हाइसरॉय १६६७ च्या नोव्हेंबर १३ ला (म्हणजे अवघ्या सात महिन्यांनी) शिवाजी महाराजांना लिहितात :

> " मी येथे आल्यापासून आशिया खंडातील सर्व राजे लोकांशी सलोख्याचे संबंध ठेवण्याचे ठरविले आणि आपणाकडे तर सर्वांत प्रथम वकील पाठविला...आपल्या-कडून पत्र नाही !... "

इसवी सन १६७५ मध्ये महाराजांनी ' फोंडा ' घेतला. फोंड्याचा देसाई पोर्तुगिजांना फितूर झाला. त्याची व त्याला आश्रय देणाऱ्यांची खोड मोडण्याची महाराजांनी योजना आखली; पण दुर्दैवाने १६८० मध्ये शिवचंद्र मावळला. पोर्तुगीजांचे पारिपत्य करायचे राहून गेले !

शिवाजी महाराजांच्या पश्चात संभाजी राजे छत्रपती झाले. त्यांनी प्रथमपासूनच पश्चिम किनाऱ्याचा बंदोबस्त करण्याची काळजी घेतली. किनाऱ्यावर पोर्तुगीज व सिद्धी या दोघांची सत्ता होती. दोघेही वारा येईल तशी पाठ करून वागत. तथापि अनुकूल संधी मिळताच मराठी राज्यास त्रास देण्यास मुळीच मागेपुढे पाहात नसत. व्यापार विषयक व धार्मिक या बाबतीत दोघांच्याकडूनही त्रास होत असे. अशा घरातल्या

शत्रूकडे संभाजी राजांनी आपले लक्ष केंद्रित केले. त्यात खालील कारणांची भर पडली–

(१) कारवारजवळ अंजदीव नावाचे बेट आहे. त्या बेटावर जलदुर्ग बांधून लष्करी ठाणे मजबूत करावे असे संभाजीने ठरविले. त्याप्रमाणे माणसे पाठवून तटबंदी करण्यास सुरुवात केली. गोव्याच्या पोर्तुगीज गव्हर्नरच्या लक्षात ही गोष्ट येताच त्याने ताबडतोब आरमार पाठवून अंजदीव बेटाचा ताबा घेतला. पोर्तुगिजांचे हे कृत्य संभाजी महाराजांना आवडले नाही.

(२) पोर्तुगीज येण्याच्या आधी समुद्रावरचा व्यापार अरब लोक करीत असत. छत्रपती संभाजी राजांचे पोर्तुगीज व जंजिऱ्याचे सिद्दी यांच्यात वितुष्ट येऊ लागल्याने संभाजी महाराजांनी दर्यावर्दी अरब लोकांना हाती धरले. त्यांना व्यापार करण्यास प्रोत्साहन दिले. अरबांच्या वखारीमुळे पोर्तुगिजांचे नुकसान होऊ लागले. या नुकसानीमुळे पोर्तुगीज संभाजी राजांचा राग करू लागले.

(३) इसवी सन १६८२ च्या सुमारास दिल्लीच्या मोंगल बादशहांनी मराठ्यांचा कोकणातील प्रदेश जिंकून घेण्यासाठी रणमस्तखान यांना पाठविले. छत्रपती शिवाजी महाराज वारले असल्याने प्रदेश जिंकण्याची कामगिरी हां हां म्हणता पार पाडता येईल, अशी त्यांची कल्पना होती. ती साफ चुकली. संभाजी महाराजांनी कल्याणजवळ रणमस्तखानाची कोंडी केली. त्याला अन्नधान्य व इतर कुमक मिळणे अशक्य केले. ह्या वेळी पोर्तुगिजांनी समुद्रमार्गाने अन्नधान्याचा पुरवठा करून मोंगल सेनापतीला मदत केली. “ शत्रूचा मित्र तो तो आपला शत्रूच ” असे ठरवून पोर्तुगिजांची खोडकी मोडण्याचा बेत छत्रपती संभाजी महाराजांनी केला.

प्रथम संभाजी महाराजांनी सुरतेपासून कारवारपर्यंतच्या समुद्र-

किनाऱ्यावर आपला अंमल बसविण्यास सुरुवात केली. परवाने घेतल्या-शिवाय किनाऱ्याने फिरकण्यास परकीय जहाजांना बंदी केली. आधीच विघडत चाललेले पोर्तुगिजांचे संबंध आणखी बिघडले.

याच सुमारास औरंगजेब बादशहाचा मुलगा अकबर संभाजी राजांच्या आश्रयास आला. त्याला मक्केस पोहोचविण्यासाठी संभाजी महाराजांनी पोर्तुगीजांच्याकडे जहाजे मागितली. मोंगल बादशाहांशी वैर नको म्हणून जहाजे देण्याचे पोर्तुगिजांनी नाकारले. या सर्व प्रकारांनी संभाजी महाराजांची पोर्तुगिजांच्या हेतूविषयी खात्री पटली. स्वराज्याच्या सरहद्दीवरील या बेरक्या शत्रूचा बंदोबस्त करावा, असा निश्चय करून संभाजी राजांनी ' चौल ' या ठिकाणाला वेढा दिला. फोंड्यावर हल्ला चढविला. वसईपासून दमणपर्यंतचा पोर्तुगीज मुलूख लुटून जाळून टाकला. चौल येथे संभाजी महाराजांचे नुकसान झाले. पण फोंड्यास पोर्तुगीजांची फार फजिती झाली.

फोंडयाच्या किल्ल्यावर पोर्तुगिजांनी चार दिवस तोफांचा भडिमार केल्यानंतर छोटेसे खिंडार पडले. पोर्तुगीज सैनिक आत घुसू लागताच आतील मराठ्यांनी निकराने लगट करून पोर्तुगीज सैन्याची कापाकापी सुरू केली. त्याच सुमारास संभाजी राजे वेगाने धाऊन आले. किल्ल्या-तील सैन्य आणि महाराजांच्या तुकडया यांच्यामध्ये पोर्तुगीज सापडले. पावसाने दारुगोळा भिजलेला असल्याने पोर्तुगिजांचा उपाय चालेना. बहुतेकांची कत्तल उडाली. गोव्याचा गव्हर्नर टाव्होरा खाडी ओलांडून जीव घेऊन पळाला. अपमान झाल्यामुळे तो एका चर्चच्या आश्रयाने राहिला.

फोंडयाचा बंदोबस्त करून संभाजीराजांनी गोव्याकडे मोर्चा फिरवला. आजूबाजूचा प्रदेश त्यांनी ताब्यात घेतला. जहाजे पकडून वेठीस धरली. त्यांनी गोव्यात उतरण्याची जय्यत तयारी केली. गोव्यात पोर्तुगिजांचा

थरकाप उडाला. ते भयभीत झाले. त्यांनी सेंट झेविअरच्या चर्चमध्ये जमून मराठ्यांच्यापासून सुटका होण्यासाठी प्रार्थना केल्या. झेविअरची शवपेटी उघडून तिच्या शेजारी गव्हर्नरने आपला राजदंड, राजमुद्रा ठेवली. रात्रंदिवस प्रार्थना चालू केली.

गोवामुक्तीची घटिका भरत आली होती. पण त्याच वेळी मोंगलांचा पेच आल्याने संभाजी राजांनी गोव्याची मोहीम सोडून दिली. मराठी फौजा परतल्या ! आणि पोर्तुगीज कायम राहिले !

या अनुभवाने शहाणपण शिकून पोर्तुगिजांनी संभाजी राजाशी तह केला. त्यात ठरले की—

(१) युद्धात जिंकलेले किल्ले, तोफा, जहाजे ही उभयतांनी एकमेकांना परत करावी.

(२) एकमेकांनी पकडलेले कैदी परत करावे.

(३) वसई व दमण प्रांतातील चौथाई व गावखंडी या दोन तऱ्हेचे कर वसूल करून पोर्तुगिजांनी ते संभाजीस द्यावे. संभाजी महाराजांनी ह्या प्रदेशाचे संरक्षण करावे.

(४) पोर्तुगिजांनी मोंगल बादशाहाचे फौजेस दारुगोळा, शस्त्रास्त्रे, अन्नधान्य पुरवू नये.

(५) व्यापारासाठी एकमेकांनी एकमेकांस सवलती द्याव्या.

" सावकारांमध्ये फिरंगी, इंग्रज, वलंदेज, फरांसिस, डिंगमारादि टोपीकर हेहि लोक सावकारी करितात, परंतु ते वरकड सावकारासारिखे नव्हेत. त्यांचे खावंद प्रत्यक्ष प्रत्येक राज्यच करितात. त्यांचे हुकुमाने त्यांचे होत्साते हे लोक या प्रांती सावकारीस येतात. राज्य करणारास स्थल लोभ नाही, यैसे काय घडो पाहते ? तथापि टोपीकरांचा या

प्रांते प्रवेश करावा, राज्य वाढवावे. स्वमत प्रतिष्ठावें हा पूर्ण अभिमान. तदनुरूप स्थलोस्थली कृतकार्येही जाले आहेत. त्याहीवरी हट्टी जात. हातांस आले स्थल मेलियाने सोडावयाचे नव्हेत!" या गोष्टीचा अनुभव आला!

□ □ □

८ : वसईची मोहीम

इसवी सन १५१२ च्या सुमारास पोर्तुगिजांनी वसईस आपली वखार घातली. त्या वेळी वसईवर अहमदाबादच्या सुलतानांचा अंमल होता. परदेशी व्यापाऱ्यांच्या व्यापारापासून जकातीचे चांगले उत्पन्न येईल, या आशेने सुलतानाने पोर्तुगिजांना, जागा आणि इतर सवलती दिल्या. पोर्तुगिजांनी प्रथम गोडीगुलाबीने वागून आपला जम चांगलाच बसविला. स्थानिक लोकांत विश्वास आणि पत उत्पन्न केली. वखारीची डागडुजी करून तीत तोफा आणि इतर उत्तम हत्यारे आणून ठेवली. मागोमाग त्यांचे आरमारही गोव्याहून वसईस आले. त्याच्या जोरावर सुलतानाची सत्ता बाजूला लोटून पोर्तुगिजांनी वसई ते मुंबईपर्यंत किनाऱ्याचा मुलूख आपलासा केला. तो ' फिरंगण ' म्हणून ओळखला जाऊ लागला. इसवी सन १५५६ सालच्या सुमारास वसई, मनोर, दीव, इत्यादी ठिकाणी किल्ले बांधून पोर्तुगिजांनी ' फिरंगणा'त आपली सत्ता पक्की केली.

शिवाजी महाराजांच्या पश्चात मराठी राज्यावर मोठी संकटे आली. औरंगजेबाच्या स्वारीने राज्याची घडी विस्कटली. छत्रपती संभाजी

राजांचा वध झाला. गड, कोट, किल्ले यावर मोंगलांचा अंमल बसला. राजपुत्र शाहू आणि त्याची आई मोंगलांच्या कैदेत पडली. राजाराम महाराज गोसावी बनून जिंजीकडे राजधानी घेऊन गेले. मराठी राज्यावर प्राणान्तिक संकट आले.

औरंगजेबाच्या मृत्यूमुळे मराठे विजयी झाले. पण ते केवळ नाममात्र! त्यांच्या राज्याची शान मात्र पार बिघडून गेली. शाहू महाराजांची कैदेतून सुटका झाली व मराठ्यांत दुफळी झाली. शाहू महाराज गादीवर आले; कोल्हापूरला भोसल्यांची दुसरी गादी स्थापन झाली. शाहू महाराज गादीवर आले, तेव्हा कोकणात आंग्रे, सावंत, कोल्हापूरचे छत्रपती, हबशी, इंग्रज, पोर्तुगीज इतक्यांचा अंमल होता. शाहूच्या पेशव्यांनी अनेक खटपटींनी आंग्रे, सावंत, कोल्हापूरकर भोसले यांना वठणीवर आणले. परदेशी सत्ताधीशांपैकी इंग्रजांपेक्षा त्या वेळी पोर्तुगीज 'फिरंगी'च जास्त शिरजोर झाले होते. पण त्यांना आंग्रे यांच्या आरमारापुढे अनेक वेळा हार खावी लागली.

इसवी सन १७२१ च्या सुमारास पोर्तुगीज व इंग्रज यांनी आपसात मैत्री करून दोघांनी मिळून आंग्रे यांचे आरमार बुडविण्याचा बेत ठरविला. गोव्याहून फिरंग्यांची जहाजे त्यांच्या गव्हर्नराच्या नेतृत्वाखाली चौलवर चालून आली, तेथे इंग्रजांची जहाजे मदतीला येऊन मिळाली. दोघांनी कुलाब्याला वेढा दिला. थोरले बाजीराव पेशवे यांना हे कारस्थान वेळीच समजले. त्यांनी पिलाजी जाधवरावांना पंचवीस हजार फौज घेऊन आंग्रे यांच्या मदतीस पाठविले. ते स्वतःही फौजेसुद्धा कुलाब्याजवळ दाखल झाले. मराठ्यांची तयारी पाहून फिरंग्यांचे हातपाय गळाले. ते तह करण्याच्या गोष्टी करू लागले. पण इंग्रजांची तहास तयारी नव्हती. शेवटी पोर्तुगिजांनी आपल्या मित्रांना दगा दिला. मराठ्यांशी त्यांनी परस्पर तह केला! इंग्रजांना फसवून त्यांनी आपली

सुटका करून घेतली.

पोर्तुगिजांनी माघार घेतली. त्यांचे फिरंगणातील प्रजेला छळणे चालूच होते. त्यांच्या दृष्टीने व्यापाराला दुय्यम स्थान मिळून धर्मप्रसाराची मोहीम जोरात सुरू झाली. बाटवाबाटवीच्या कटकटींनी प्रजा हैराण झाली.

याच सुमारास कल्याण, भिवंडी व त्याच्या आजूबाजूचा मुलूख बाजीराव पेशव्यांचे मेव्हणे रामचंद्र महादेव यांनी काबीज केला. फिरंग्यांच्या प्रदेशाला खेटून मराठी सुभा झाला. त्यामुळे फिरंगणातील प्रजेला आधार वाटला. रामचंद्र महादेव यांच्याकडे मंडळी येऊन त्यांच्यावर होत असलेल्या जुलमांच्या कहाण्या सांगू लागली.

अणजूरच्या नाईक घराण्यातील गंगाजी नाईक यांनी व त्यांच्या भावांनी पेशव्यांच्याकडे मदत मागण्याचे ठरविले. चिंचवडच्या मोरया गोसाव्यांचे वंशज नाईकांचे गुरू होते. गुरूंच्याकडून गंगाजी नाईकांनी ओळखपत्र घेतले. ते कल्याणला जाऊन रामचंद्र महादेव यांना भेटले. धार्मिक छळांच्या हकीकती सांगून त्यांनी रामचंद्र महादेव याना फिरंगणातील हिंदू रयतेची सुटका करण्याची विनंती केली. त्यांनी ह्या बाबतीत पुढाकार घेण्याचे आश्वासन दिले.

अणजूरकर नाईक कल्याण येथे येऊन राहू लागले. कल्याणहून त्यांनी फिरंगी मुलुखावर छोट्या स्वाऱ्या केल्या. त्यामुळे पोर्तुगीज चिडले. त्यांनी फितुर लोकांची कत्तल केली व अणजूरकरांच्या नातेवाईकांना कैदेत टाकले. काहींना गोव्यास रवाना केले. तेथे त्यांना तेलात भिजविलेले कपडे घालून जिवंत जाळण्यात आले ! पेशव्यांच्याकडे या सर्व हकीगती येत होत्या.

अणजूरकर नाईकांच्याप्रमाणेच मालाड येथील अंताजी रघुनाथ कावळे यांनीही पेशव्यांची भेट घेऊन स्वारी करण्याबद्दल पेशव्यांचे मन वळविले.

इसवी सन १७३० मध्ये पेशव्यांच्यातर्फे पिलाजी जाधवाने वसई प्रांतात मोहीम काढून पोर्तुगिजांची बरीच नुकसानी केली.

इसवी सन १७३४ च्या सुमारास पोर्तुगिजांनी ठाण्याला तटबंदी बांधावयास सुरुवात केली. त्यासाठी लोकांना वेठीने कामाला लावण्यात आले. साष्टी वसईतील सर्वांना बाटविण्यासाठी त्यांच्या याद्या करण्यात आल्या.

इ. सन १७३७ मध्ये चिमाजीआप्पांनी वसईची मोहीम सुरू केली. त्यांनी ठाणी घेऊन साष्टीकडे प्रवेश केला. अधलीमधली लहानमोठी ठाणी त्यांनी ताब्यात घेतली. सोपारे मराठ्यांच्या हाती पडले. वसई-जवळचा अर्नाळा किल्ला सर झाला. आगाशीवर झेंडे चढले ! होनाजी बलकवड्यांनी वेसावे घेतले. खंडोजी माणकरांनी वांद्र्याला वेढा घातला, नारायण जोश्यांनी पारसिक, बेलापूर घेतले. मराठ्यांनी वसईवर मोर्चे लावले ! मे १७३७ व जून १७३७ मध्ये मराठ्यांनी वसईस दोन निकराचे हल्ले चढविले. शिड्या लावून, माणसे बुरुजांवर चढविण्याचा प्रयत्न केला. पोर्तुगिजांनी तोफा–बंदुकांतून आगीचा वर्षाव केल्याने मराठ्यांच्या फौजेची फार खराबी झाली. लोकांनी हल्ल्याची धास्ती खाल्ली.

वसईवर निकराचा हल्ला करण्यासाठी चिमाजीआप्पांनी आपल्या भरवशाचे शूर सरदार बाजी भिवराव रेठरेकर यांना मुद्दाम बोलावून घेतले. त्यांनी तीन हजार पायदळ शिड्या लावून तटावर चढविण्याची योजना आखली. पायदळाभोवती घोडेस्वारांचे कडे उभे केले. भीतीने कोणी पळून जाऊ लागला तर त्यास बेलाशक कापून टाकावा, असा हुकूम दिला. पाचसात ठिकाणी शिड्या लावून सैनिक वर जाण्याचा प्रयत्न करू लागले. वरून फिरंगी आग ओकू लागले. हल्ल्याची टिपर-घाई ! शत्रूने वरून शिड्या ढकलून दिल्या. मराठ्यांना परत फिरावे लागले. मराठ्यांची या हल्ल्यात पाचसातशे माणसे मेली. पाचसातशे

जखमी झाली ! स्वतः बाजी भिवरावही जखमी झाले ! मराठ्यांनी किल्ल्याभोवती मोर्चेबंदी केली. पोर्तुगिजांना या सुमारास दारूगोळ्याची कुमक आली.

वसईवर एकाच ठिकाणी न थांबता मराठ्यांची फौज फिरंगणातील इतर ठिकाणांकडे वळली. केळवे, शिरगाव, तारापूर ही ठिकाणे पदरात पाडून घेण्याचा त्यांनी प्रयत्न केला. ती ठिकाणे जिंकली. तारापूरच्या किल्ल्यावर निकराचा संग्राम झाला. त्यात हानी खूप झाली. आघाडीवर असणारे बाजीराव रेठरेकर तोंडात गोळी लागून ठार झाले. त्यामुळे पेशव्यांना खूप दुःख झाले. तारापूर सर झाले.

येथे पोर्तुगिजांची बायकामुले मराठ्यांच्या हाती लागली. चिमाजी आप्पांनी त्यांना सन्मानाने परत पाठविले, बहुतेक सर्व प्रदेशावर ताबा बसवून वसईचा सोक्षमोक्ष लावण्यासाठी चिमाजी आप्पांनी आपली झाडून सर्व फौज वसईस जमा केली.

या जमावात मराठ्यांचे बहुतेक सर्व नामांकित सरदार होते. पिलाजी जाधवराव, मल्हारराव होळकर, राणोजी शिंदे, शितोळे, कदमबांडे वगैरे सगळे आले. मालाडचे कावळे आले. अणजूरकर नाईक, भंडारी मंडळी तर बेहोष झाली. सामानसुमानाची, दारूगोळ्याची मोठी तरतूद करण्यात आली. मागील तीन वेळा फौजेने मार खाल्ला होता. पण खुद्द चिमाजी आप्पाच मोर्चात दाखल झाल्याने सर्वांना हुरूप आला. इतर ठाणी ठिकाणे मराठ्यांच्या ताब्यात आल्याने मराठे शेर झाले होते.

दिनांक ६ फेब्रुवारी १७३९ ला मराठ्यांनी वसईच्या किल्ल्याच्या तटाजवळ उंच मोर्चे बांधण्यास सुरवात केली. त्यावर शत्रूने तोफांचा भडिमार केला. पण माघार न घेता मोर्चांचे काम चालूच राहिले. रात्रीही काम बंद झाले नाही. दिवे, पलिते न लावता अंधारात काम करून हजारो माणसांनी मोर्चे तयार केले. त्यावर पोर्तुगिजांच्याकडून

जिंकलेल्या तोफा चढल्या. मराठ्यांचा निश्चय पाहून फिरंगी चकित झाले !

मराठ्यांचे मोर्चे वसईस एका उत्तर दिशेने होते. किल्ल्याच्या इतर भागावर समुद्र होता. किल्ल्यातून मोर्चांवर तोफांची सरबत्ती सुरू झाली.

मार्च महिन्यात मराठ्यांनी किल्ल्याच्या तटाच्या तळाचा गाळ काढून, तटाला वापरलेल्या दगडी चिऱ्यांत सुरुंग भरले. तटाला शिड्या लावून आत न जाता त्याला भगदाड पाडून आत प्रवेश करण्याचा मनसुबा मराठ्यांनी रचला.

दिनांक ३० एप्रिल हा हल्ल्याचा दिवस ठरला. नगाऱ्याच्या इशाऱ्याबरोबर सुरुंग पेटवायचे. त्यांचा भडका उडून बुरजात खिंडार पडताच फौजेने सर्व शक्तीनिशी किल्ल्यावर तुटून पडावयाचे असा बेत ठरला. फौज तयार झाली, नगाऱ्यावर टिपरी झडली. सुरुंगाला बत्त्या मिळाल्या ! " डावे बाजूचे सुरुंग अजून काही उडणे होते. तोच लोकांनी उतावीळ करून चालून घेतले. लोक कोटावर चढताच शिल्लक राहिलेले सुरुंग उडाले. त्यामुळे माणसे जाया झाली. " पण एका वेळी वीस पंचवीस माणसे घुसू शकतील इतके मोठे भगदाड तटाला पडले ! पाण्याच्या लोंढ्याप्रमाणे या खिंडारातून मराठे आत घुसले ! पोर्तुगिजांनीही गोळीबार करून आगीचा मारा भरपूर केला. मराठे सैन्याला मारा सोसवेना. बुरुजांना आणखी दोन ठिकाणी भगदाडे पडली. पण शत्रूने कुणाला आत येऊ दिले नाही. मराठ्यांची निशाणे दोन वेळेला हिसकावून घेतली. संध्याकाळ झाली. फौज परत फिरली.

चिमाजी आप्पा इरेस पेटले, त्यांनी सैनिकांना चेतावणी दिली. हुरूप आणला. " माझे मस्तक तरी तोफेच्या तोंडी देऊन ते किल्ल्यात जाऊन पडेल असे करा, " असे ते आवेशाने म्हणाले. लोकांना त्यांनी ताकीद

दिली : “ पडेल तो पडेल, पण राहील त्याने कोटावर निशाण चढवावे. ”

किल्ल्याच्या तटाला भगदाडे पडली होती. तटावरील तोफा मागे घेऊन तेथे फिरंग्यांनी पलटण आणून उभी केली. मराठ्यांनी आणखी सुरुंग उडवून भगदागे पाडली. सैनिक आत घुसले ! हातघाईची लढाई सुरू झाली. योद्ध्याला योद्धे भिडले ! कत्तल, मारामारी, आरडाओरडा, रणगर्जना यांनी वातावरण भरून निघाले. दोन्ही बाजूंचे लोक पडत होते. जखमी होत होते, मराठ्यांच्या झुंडीच्या झुंडी किल्ल्यात घुसू लागल्या. फिरंगी सैनिकांना कंठस्नाने घडली ! मराठ्यांची हानीही मोठी झाली. पण....“ लष्करच्या हशमांनी छातीचा कोट करून ते बुरुजाच्या ओघळीस व दरडयास बिलगून बसले; ” ते जागा सोडीत नाहीत, असे पाहून पोर्तुगीज मागे हटले. रात्र पसरली.

दिनांक ४ मे १७३९ ची प्रभात झाली. झुंजूमुंजू होताच तटावर बसून राहिलेले मराठे हल्ल्यासाठी तयार झाले. मागून कुमकीची पथके धावत येऊ लागली. इकडे पोर्तुगिजांची सद्दी संपली होती. त्यांची माणसे दगावली, दारूगोळा संपला, त्यांनी शरणागतीचे पांढरे निशाण फडकाविले, तहाची बोलणी करण्यास वकील चिमाजी आप्पांकडे दाखल झाला. तहाची कलमे ठरली, तीनशे वर्षे ताब्यात असलेला वसईचा किल्ला मराठ्यांच्या ताब्यात आला. चिमाजी आप्पांनी उदार मनाने शिल्लक राहिलेल्या पोर्तुगिजांना त्यांच्या जवळील शस्त्रास्त्रांसुद्धा बाहेर जाण्यास परवानगी दिली. शाहू महाराजांना स्वतः चिमाजी आप्पा लिहितात : “ वसई जागा बाका बुलंद !...फिरंगियांनी हिंमत...धरून शिपाईगिरी म्हणावी तशी केली. पूर्वी भारतीय युद्धात अतिरथी महारथी झुंजले. त्याच न्याये प्रस्तुत काळी महाराजांचे एकनिष्ठ सेवक लोकही विरथीपणे झुंजले. इतकी आग पिऊन मराठी फौजेने दम धरला, असे कधी झाले नाही, सीमा झाली ! ”

चिमाजी आप्पांचे अनेकांनी अभिनंदन केले. अमृतराव शंकर लिहितात : “ वसई फत्ते जाहली. याजपेक्षां श्रीकृपें महत्कार्ये होऊन हिंदूराज्याचें संस्थापन स्वामींचे हातून होतील. वसईचा प्रसंग म्हणावा तरी हस्तगत होईल यैसा भरवसा कोणास नव्हता. परंतु स्वामींचा थोर निश्चयामुळेंच वसई फत्ते होऊन देव, ब्राह्मण जोसी-गणिक या सर्वांस खरे केलें ! ”...त्रिंबक पटवर्धन लिहितात : “ यैसे कर्म मागेंहि कोणास न जाले ! किंवा पुढेंहि न होणार. ऐसी गोष्ट स्वामींच्या हातून जाली. ” पिलाजी जाधवांनी चिमाजी आप्पांच्या मातुश्रींना लिहिले : “ ईश्वरें राजश्री आप्पांची फत्ते केली. येणेंकरून सुस्त आदि जागे पादाक्रांत आहेत ! ” चिंचवडचे देव लिहितात : “ वसई फत्ते झाली. संस्थानच प्राप्त जाले ! राज्येंच एक सुटले ! फिरंगी स्थळापासून घेतले. ईश्वरें यास स्थळ दिले. मोठी फत्ते जाली. फार यत्न केला. ऐसा यत्न या राज्यात कोण्ही केला नाही” आणखी एक सरदार लिहितात : “ दक्षिणची फौज मऊ लागले म्हणजे बेजरब घेणार; कठीण लागले म्हणजे फिरोन पाहणें नाही, ऐसी पूर्वापार या राज्याची तऱ्हा. ज्या प्रकारे वानरांकडून लंका घेवविली त्या प्रकारें गोष्ट जाहाली...”

वसईच्या लढाईत अवघ्या दोन दिवसांत खूपच हानी झाली. मराठयांचे सुमारे पाच हजार व पोर्तुगिजांचे सुमारे चार हजार सैन्य ठार झाले. सर्व सुरुंग उडण्याचे आधीच लगट केल्यामुळे मराठ्यांचे बरेच सैनिक घारीसारखे हवेत उडाले व पडणाऱ्या दगडमातीखाली गाडले गेले !

वसईसाष्टीतून पोर्तुगिजांचा अंमल उठला. लोकांचा धार्मिक छळ बंद झाला. परदेशी फिरंग्याच्या उत्तर कोकणातील हालचाली बंद झाल्या. मुंबईत इंग्रजांचे धाबे दणाणले !

चिमाजी आप्पांनी ठाणे, साष्टी, वसईतून फिरंग्यांची त्या वेळी हकालपट्टी केली. नाही तर त्यांचा अंमल तेथे कायम राहता आणि १९६१ च्या 'विजय मोहिमेत' दीवदमणप्रमाणे भारतीय सेनेस वसईला मोहिमेस जावे लागले असते.

□ □ □

९ : राण्यांची महाप्रतापी परंपरा

□ □ □ □ □ □ □ □ □ □ □ □ □ □

इ. सन १७५५ पासून १९१२ पर्यंत सुमारे दीडशे वर्षांत सत्तरी महालातील राण्यांनी पोर्तुगिजांच्या सत्तेविरुद्ध अनेक बंडे केली. भूकंपाचे धक्के बसावेत असे धक्के त्या बंडांनी पोर्तुगिजांना दिले.

सत्तरीचे राणे हे मूळचे राजपूत होते. तीनचारशे वर्षांपूर्वी ते महाराष्ट्रात आले. राणे सावंतवाडीच्या भोसल्यांच्याकडे चाकरीला राहिले. सावंतवाडीकरांच्यातर्फे ते सत्तरीचे मोकासदार झाले. आपल्या धन्याबद्दल त्यांना अतिशय आदर असे.

सावंतवाडीला लागूनच गोव्याचा पोर्तुगीज प्रदेश सुरू होई. मराठ्यांच्यातर्फे भोसल्यांनी आणि पेशव्यांचे सरदार व्यंकटराव घोरपडे यांनी मोहीम काढली. दोघांच्यामध्ये एकजुटीपेक्षा चढाओढी व मत्सराचे थैमान सुरू झाले. पेशव्यांनी व्यंकटराव घोरपड्यांना मोहिमेवरून परत बोलावले. सावंतवाडीकर भोसल्यांनी पोर्तुगिजांच्यावरची मोहीम चालू ठेवली;

पण त्यांना अपयश आले. पोर्तुगिजांनी गेलेला मुलूख परत मिळविलाच, शिवाय तेरेखोल, रेडी, सत्तरीही काबीज केली.

सावंतवाडीकरांच्या पराभवामुळे राण्यांना चीड आली. त्यांनी बंडाचे निशाण उभारले. संत्रोजी राण्याने हल्ले करून त्रास देण्यास सुरुवात केली.

पोर्तुगीज सरकारने तंबाकूवर कर बसविला. त्या कराच्या विरुद्ध सत्तरीच्या राण्यांनी लढा दिला. कर रद्द करावयास पोर्तुगिजांना भाग पाडले. येवढेच नव्हे तर पोर्तुगिजांनी राण्यांशी सामोपचाराचे धोरण स्वीकारले. राण्यांना आपल्या सैन्यांत सुभेदारी दिली. पण एवढयाने चढाई थांबली नाही. तंबाखूच्या करानंतर राण्यांनी शेतसारा भरण्याविरुद्ध बंड पुकारले. ते चांगले १७८२ ते १८२५ पर्यंत म्हणजे सतत ४३ वर्षे चालले. जंगली प्रदेशात, डोंगरांवर, बंडखोरांचा बंदोबस्त करणे पोर्तुगिजांना जमले नाही. शेवटी मागण्या मान्य करण्यात आल्या.

ही बंडे चालली होती. पोर्तुगिजांचे नवे नवे हुकूम निघतच होते. कधी तुळशीवृंदावनावर बंदी झाली. तर कधी तुमानी चढविण्याची मनाई झाली. धार्मिक जुलुमांचे तर बोलावयासच नको. जमिनीच्या कराबद्दलही कटकटी असत. इ. स. १८५२ मध्ये राण्यांनी या सर्व गोष्टींविरुद्ध बंड पुकारले. दिपाजी राणे यांनी या बंडाचे नेतृत्व केले.

दिपाजी राणे हे शरीराने बुटके होते. त्यांच्या मानेवर मोठे आवाळू होते. त्यांच्या गळ्यात पोवळ्यांची माळ असे व हातांमध्ये रुप्याची कडी असत. ते अंगावर उपरणे पांघरीत. त्यांच्या हातात सदैव दोन बारी बंदूक भरलेली असे. दिपाजी राण्यांनी आपल्या पराक्रमांनी पोर्तुगीज अंमलातील बराच मुलूख परत सोडविला. गरीब शेतकरी दिपाजी राणे यांना मदत करीत. मात्र व्यापारी आणि सारस्वत ब्राह्मण यांनी दिपाजीस मदत केली नाही. दिपाजी राण्याच्या बंडाने पोर्तुगीज सत्तेला भेगा

पडल्या. काही भागातील त्यांचा अंमल उठला.

पोर्तुगिजांच्या मानाने राण्यांचे सामर्थ्य कमी असे. परंतु डोंगराळ मुलखात राहून ते गनिमीकाव्याच्या पद्धतीने युद्ध करीत. स्थानिक बहुजनसमाजाचे त्यांना साहाय्य असल्याने सामर्थ्य कमी असूनही राण्यांचा टिकाव चांगला लागला. शेवटी पोर्तुगीज गव्हर्नर कंटाळून स्वदेशी निघून गेला. त्याने नेमलेल्या कारभारी मंडळाने शेवटी दिपाजी राण्याशी तह केला. त्यांचे म्हणणे मान्य केले. सत्तरीच्या मराठ्यांची एक पलटण पोर्तुगिजांनी ठेवावी असेही या वेळी ठरले.

दिपाजी राण्यांच्या पश्चात् कुष्टोबा राणे यांनी बंड केले आणि आठ वर्षे निकराचा लढा दिला.

इ. सन १८९५ साली आफ्रिकेतील वसाहतीमध्ये पोर्तुगिजांच्या विरुद्ध बंड झाले. ते मोडून काढण्यासाठी हिंदी लोकांच्या पलटणी नेण्याचे त्यांनी ठरविले. शिपायांच्यामध्ये याबद्दल असंतोष फैलावला. दिपाजी राण्यांचा मुलगा दादा राणे यांनी शिपायांचे नेतृत्व स्वीकारले. शेतकरी रयतही त्यांना सामील झाली. भारतातील ब्रिटिश मुलुखामधले लोकही दादा राण्यांच्या मदत करू लागले पोर्तुगीज सैन्यामधील हिंदी लोक राण्यांच्या सैनिकांवर गोळ्या झाडीत नसत. राण्यांच्या सैन्यातील शिपाई गोऱ्या पोर्तुगीज सोजिरांना अडचणीत गाठून त्यांना नेमक्या गोळ्या घालीत. खूप धामधून झाली. पोर्तुगालहून खास कुमक आली. बंडाविरुद्धची मोहीम जारीने चालविण्यासाठी पोर्तुगालच्या राजाचा भाऊ मुद्दाम इकडे आला. पण लढाईत तो जखमी झाला. लढाईत राणे ऐकत नाहीत, असे पाहून पोर्तुगीजांनी वाटाघाटीचे बोलणे लावले. दादाजी राणे यांना त्यांनी विश्वासघाताने पकडले. त्यांना बंडाच्या आरोपावरून जन्मठेपीची शिक्षा देऊन आफ्रिकेत धाडून देण्यात आले. दादा राण्यांचे नेतृत्व अशा रीतीने संपल्यामुळे बंडवाल्यांना नेता राहिला नाही.

पोर्तुगिजांनी बंडाशी संबंध असलेल्यांची क्रूरपणे कत्तल केली. घरेदारे व मालमत्ता जप्त करण्यात आली. घरे जाळून टाकण्यात आली.

राण्यांची काही घरे शिल्लक होती. या प्रचंड लढ्यात राण्यांना ती अधूनमधून आपली चुणूक दाखवीत. भारतातील क्रांतिकारकांना राणे मंडळींनी आश्रय दिला होता. शस्त्रे व दारूगोळा ह्यांचा पुरवठाही त्यांच्यामार्फत होत असे. इ. सन १९१२ साली हरबा राणे त्यांच्या नेतेपणाखाली बंडाचा उठाव झाला. पण तो फसला. अनेकांना फाशीच्या आणि जन्मठेपीच्या शिक्षा झाल्या.

अशा रीतीने राणे घराण्यातील मंडळींनी दीडशे वर्षे लढा दिला. या लढ्यात त्यांनी पराक्रम व त्याग यांची एक मोठी परंपराच निर्माण केली. सामान्य जनतेने राण्यांना साथ दिली. या प्रचंड लढ्यात राण्यांना शेवटी हार खावी लागली तरी त्यांच्या पराक्रमाची व त्यागाची स्मृती स्फूर्तिदायक अशीच आहे. राणे मंडळींचा पराक्रम गोव्याच्या इतिहासात तेजस्वीपणे तळपत राहील यात शंकाच नाही.

□ □ □

१० : गोव्यातील सत्याग्रह

□ □ □ □ □ □ □ □ □ □ □ □ □ □

ब्रिटिश साम्राज्याच्या जोखडातून सुटण्यासाठी भारतातील प्रजेने सुरुवातीपासून लढे दिले. अनेक ठिकाणी बंडे झाली. उठाव झाले. पण शस्त्रसामर्थ्याच्या जोरावर इंग्रजांनी ते दडपून टाकले. प्रजेची शस्त्रे कायद्याचा वापर करून काढून घेतली. निःशस्त्र प्रजा सशस्त्र राज्याशी लढून कधीही यशस्वी होणार नाही. अशी इंग्रजांची अटकळ होती. पण भारतीय नेत्यांनी राष्ट्र उठावणीचे निरनिराळे मार्ग अमलात आणले. स्वदेशीचा पुरस्कार केला, राष्ट्रीय शिक्षणाचा प्रसार झाला. निरोधने व सत्याग्रह या मार्गाने जनता आपला विरोध धीटपणाने मांडू लागली. सरकार अत्याचार करी. लाठीमार, गोळीबार होत. अनेकांना तुरुंगाची हवा खावी लागे. पण या अघोरी उपायांनी दबून जाण्याऐवजी भारतीय लोक अधिकच धीट झाले. तुरुंगांची गणना सत्याग्रहाश्रमात होऊ लागली. सत्याग्रहींचा ‘ वीर ’ म्हणून सन्मान होऊ लागला.

दुसऱ्या महायुद्धात इंग्रजांचा दोस्तराष्ट्रांबरोबर जय झाला. पण भारता-

तील त्यांच्या सत्तेला हादरा बसला. "चले जाव" आंदोलनाने साम्राज्यशाहीचा डोलारा हादरला. आझाद हिंद फौजेच्या उठावाने इंग्रजांचा भारतीय सैन्यावरील भरवसा गेला.

राजनीतीत इंग्रज पक्के मुरलेले! त्यांनी भारताला स्वातंत्र्य दिल्याचे घोषित केले. आपली फौज, आपले अधिकारी काढून घेऊन इंग्रजांनी सत्तान्तर केले. भारत स्वतंत्र झाला. लोक आनंदाने बेहोष झाले. स्वातंत्र्यदिनाचे सोहळे भारतभर झाले.

इंग्रज गेले, पण त्यांच्याच आगेमागे आलेले फ्रेंच व पोर्तुगीज भारतात राहिले. त्यांच्या ताब्यातील गोवे, दीव, दमण, पाँडेचरी, चंद्रनगर ठिकाणे शरीरावरील कोडाच्या ठिपक्याप्रमाणे भारतावर दिसू लागली.

शांततामय मार्गावर भारत सरकारचा विश्वास मोठा. नेत्यांना वाटे, एवढे प्रचंड इंग्रज गेले, आज नाही तर उद्या पोर्तुगीज, फ्रेंचही जातील. काळाची पावले ओळखून फ्रेंचांनी सामोपचाराने आपल्याकडे असलेली पाँडेचरी, चंद्रनगर ही ठिकाणे भारतात विलीन केली!

पोर्तुगालने मात्र अशा शांततामय सत्तान्तरास प्रथमपासूनच विरोध केला. गोवे, दीव, दमण हे भारताचे भाग नसून ते पोर्तुगालचे दूरवरचे प्रांत आहेत असाच त्यांचा दावा असे. वसाहतीतील प्रजेस राजकीय स्वातंत्र्य बिलकूल नव्हते. निराश झालेल्या गोमंतकीय प्रजेतील तरुणांनी गुप्त संघटना केल्या. 'अझाद गोमंतकदला'ची स्थापना झाली. अधून मधून स्फोट उडे. त्याचे आवाज निनादत. आझाद गोमंतकदलाने म्हणजे भारतीय जनतेने मोठ्या हिमतीने इ. सन १९५४ मध्ये दादरा नगर हवेली परगणा मुक्त केला! गोव्यातही काही ठिकाणी उठाव झाले. जे पोर्तुगिजांच्या हातात सापडले, त्यांना लांब मुदतीच्या शिक्षा झाल्या, देशातून हद्दपार व्हावे लागले. कित्येकांची रवानगी तुरुंगांच्या कोठड्यांतून झाली.

इ. सन १९५४ मध्ये गोवा नॅशनल काँग्रेस स्थापन झाली. गोव्यात भारतीय राष्ट्रध्वज फडकला. फडकविणारे मात्र तुरुंगात गेले! लोक सत्याग्रह करू लागले. त्यांना मारपीट होऊ लागली. दि. ६ एप्रिल १९५४ चे गोवा नॅशनल काँग्रेसचे अधिवेशन गोव्यातच भरविण्याचे कार्यकर्त्यांनी ठरविले. सौ. सुधाताई जोशी यांची अध्यक्ष म्हणून नियुक्ती केले. अध्यक्षांचे भाषण चालू होताच त्यांना त्यांच्या बरोबरच्या परिवारासुद्धा अटक होऊन तुरुंगात टाकण्यात आले.

भारतीय जनता सर्व पाहात होती. भारत सरकारही हे सर्व पाहात होते. सरकार मनात आणते तर सैन्य पाठवून सर्व प्रश्नही सुटला असता. पण ' शांततामय सत्तान्तर होईल, ' या आशेने भारत सरकार गप्प बसले. त्यांनी पोर्तुगीजांना वाटाघाटीचे आवाहन केले.

भारत सरकारचे हे धोरण पाहून पोर्तुगीज शेफारले. भारतीय जनतेने त्याच्या प्रतिकारार्थ उपाययोजना आरंभली. ' गोवा विमोचन समिती ' स्थापन झाली. तिच्यातर्फे सत्याग्रह मोहीम सुरू झाली. गोमंतक साहित्य संमेलनात " मी सत्याग्रहासाठी गोव्यात प्रवेश करणार, " अशी घोषणा संमेलनाचे अध्यक्ष श्री. ना. ग. गोरे यांनी केली. वयोवृद्ध सेनापती बापट आणि इतर ५४ सत्याग्रहींचा जथा घेऊन त्यांनी गोव्यात प्रवेश केला.

पोर्तुगिजांनी सत्याग्रहींना बंदुकीच्या दस्त्यांनी, दंडुक्यांनी मारहाण केली. श्री. गोरे यांना तुरुंगात टाकले. बाकीच्यांना भारतीय सरहद्दीवर मुक्त करण्यात आले. सामुदायिक सत्याग्रहाची घोषणा होताच तिला भारतामधून सर्व ठिकाणाहून प्रतिसाद मिळाला. पंजाब, बंगाल, मध्य प्रदेश, कर्नाटक, मद्रास इत्यादी लांबलांबच्या प्रदेशांतील लोकांनी नावे नोंदविली. महाराष्ट्रात तर अतिशय उत्साहाचे वारे वाहू लागले. ठिक-ठिकाणाहून सत्याग्रहींच्या तुकडया येऊ लागल्या. १५ ऑगस्ट १९५५

हा मुहूर्त ठरला. बांदा, आरोंदा, कणकुंबी, दोडामार्ग, तेरेखोल, दीव, दमण, अशा अनेक आघाड्यांवर सत्याग्रही वीरांच्या तुकड्या रवाना झाल्या. आदल्या दिवशीच सत्याग्रहींनी आपआपले मोर्चे धरले. भारत-मातेच्या जयजयकाराने वातावरण दुमदुमले ! राष्ट्रीय झेंडे उंच उभारून तहान, भूक, उन्ह यांची पर्वा न करता सत्याग्रही तयार झाले ! शांततेने सत्याग्रह ! तोही सशस्त्र पोर्तुगिजांच्या रानटी सत्तेशी ! हा अपूर्व लढा पाहण्यासाठी अनेक परदेशी वार्ताहर, छायाचित्रकार जमा झाले. जगाचे लक्ष सत्याग्रह मोहिमेकडे लागले.

सत्याग्रहींनी भारतीय सरहद्द ओलांडून दिनांक १५ ऑगस्ट १९५५ ला गोव्याच्या पोर्तुगीज हद्दीत प्रवेश केला ! मातृभूमीचा जयजयकार करीत काही पावले पुढे जाताच पोर्तुगीज सैनिकांनी गोळीबार केला. सत्याग्रहींमधील श्री. थोरात, श्री. सहा, श्री. कर्नालसिंग, श्री. मधुकर चौधरी, श्री. महांकाळ, श्री. हिरवे गुरुजी जागच्या जागी ठार झाले. कित्येक सत्याग्रही जखमी झाले. गोळीबारात जखमी होऊन पडणारांनी आपल्या हातांतील झेंडे इतर सत्याग्रहींकडे द्यावे. ते घेऊन सरपटत सरपटत पुढे सरकणारे सत्याग्रही पाहून परदेशी वार्ताहर चकित झाले ! अनेक जखमींना त्यांनी मदत केली ! नेत्यांनी संयमपूर्वक सत्याग्रहींना माघारी फिरवले.

सत्याग्रहींच्या बलिदानाने भारत हादरला ! जग हादरले ! पोर्तुगिजांना मात्र आपल्या कृत्याचे काहीच वाटले नाही. सत्याग्रहींच्या बलिदानाने गोवा मुक्ती आंदोलनाला जागृती आली. बलिदान करणारे हुतात्मे थोर होत. त्यांना भारतीय जनता सदैव वंदन करील.

□ □ □



११ : विजय मोहीम

□ □ □ □ □ □ □ □ □ □ □ □ □□

'शांततामय सहजीवन' व 'वाटाघाटींनी मतभेदांची सोडवणूक' ही भारताच्या परराष्ट्रीय धोरणाची सूत्रे आहेत. आंतरराष्ट्रीय मतभेदांच्या जाळ्यांचा गुंतावळा सोडविण्यास सामर्थ्याचा उपयोग न करता चर्चा, देवाणघेवाण हे मार्ग भारत सरकारला पसंत आहेत. त्या दृष्टिकोनातून राष्ट्रीय आपत्तींची सोडवणूक सांप्रतच्या सरकारकडून होते. इंग्रजांनी वाटाघाटींनी भारतात सत्तान्तर केले, तसे पोर्तुगालने करावे, असे भारताने वारंवार सुचविले. त्याची दखल पोर्तुगिजांनी मुळीच घेतली नाही. भारताने निषेधार्थ पोर्तुगालबरोबरच राजकीय संबंध तोडून टाकले.

सत्याग्रहाच्या आंदोलनाने भारतीय जनतेत गोवा मुक्ततेची ओढ फार लागली. जनतेने गोवामुक्तीसाठीं सरकारवर बरेच दडपण आणले.

याच सुमारास आफ्रिकेतील पोर्तुगीज वसाहतीत तेथील जनतेने स्वातंत्र्यासाठी उठाव केले. अंगोल्यात पोर्तुगिजांनी आपले पाशवी सामर्थ्य वापरून सामुदायिक कत्तली व जाळपोळ करून तेथील राष्ट्रीय चळवळ दडपून टाकण्याची मोहीम काढली. सुसंस्कृत जगाकडून त्याबद्दल होत असलेल्या छि:थूकडे कानाडोळा करून आपला दडपशाहीचा वरवंटा तसाच चालू ठेवला.

जे अंगोल्यात घडले तेच गोव्यात घडणार याबद्दल कोणासही संशय राहिला नाही. युरोपातील 'नाटो' या लष्करी संघटनेतर्फे मिळणारी बरीच शस्त्रे व सैनिक गोव्यात आणल्याच्या बातम्यांनी मने अस्वस्थ झाली. नाटोचा तळ म्हणून गोव्याचा वापर होणे हेही भारतास धोक्याचेच होते.

गोव्याचा प्रश्न सैनिकी सामर्थ्य न वापरता सोडवला जाईल, अशी अनेक वेळा आश्वासने भारत सरकारने दिल्यामुळे पोर्तुगीज निर्भय झाले. त्यांना चेव चढला. त्यांनी गोमंतकात राष्ट्रीय चळवळ दडपून टाकण्यासही सुरुवात केली. पोर्तुगिजांचा माजोरीपणा इतका वाढला की कारवारजवळच्या अंजदीव बेटावरून त्यांनी भारतीय जहाजावर व मच्छीमारी करणाऱ्या बोटींवर गोळीबार केले. ह्या गोळीबारात एक भारतीय कोळी ठार झाला.

या घटनेमुळे भारतभर संतप्त वातावरणाची लाट उसळली. भारतीय लोकसभेत, जाहीर सभांतून सरकारवर टीकेची झोड उठली. याच सुमारास दिल्लीस आफ्रिकेतील व आशियातील प्रतिनिधींचा एक परिसंवाद झाला. सर्वांनी पोर्तुगालचा धिक्कार केला.

भारताचे पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांनी आपले धोरण जाहीर केले. "आवश्यक वाटले तर भारत सामर्थ्याचा वापर करण्यासही कचरणार नाही," असे ते म्हणाले. यूनोच्या ठरावाप्रमाणे वसाहती

मुक्त होणे हेही आवश्यक असेच होते. पण ' फिरंग्यांनी ' काळाची पावले ओळखली नाहीत. आपला जीर्ण दृष्टिकोन त्यांनी मुळीच बदलला नाही. इंग्लंड, अमेरिका व इतर मित्रराष्ट्रे यांनीही पोर्तुगालला आपले धोरण बदलण्याचा सल्ला द्यावा, तसा दिला नाही.

गोव्याचा प्रश्न हा भारताच्या इभ्रतीचा प्रश्न झाला. तो सोडविण्यासाठी सामर्थ्याचा उपयोग करावा लागणार, हे अखेर पटून भारताने आपली चतुरंग सेना गोवा सरहद्दीकडे रवाना केली, पायदळी तुकड्या गेल्या, तोफखाना पुढे सरसावला, रणगाडयांची घरघर रणगीत गाऊ लागली. गोव्याच्या सरहद्दीकडे जाणाऱ्या मार्गांनी भारतीय सैनिकांची वाटचाल सुरू झाली; भारतीय रेल्वेच्या खास गाडया भरून सैनिक व सरंजाम निघाले.

भारतीय जनता उत्सुक झालेली. रस्त्याने जनतेने सैनिकांचे स्वागत करून त्यांना प्रेमाने निरोप दिले होते. वाटेत भेटणारी जनता हात हलवून जयहिंदच्या निनादात सैनिकांना पाठिंबा देत होती. शेतात राबणारे शेतकरी सैनिकांना ऊस, हरबरा देऊन आपली आपुलकी व प्रेम दर्शवीत होते. सैनिकांच्या हालचाली योजनाबद्ध व शिस्तीत चालल्या होत्या. भारतीय आरमारही गोव्याच्या समुद्रात येऊन ठाकले. विमानदलांनी आपली तयारी केली. आठवडयाभरात सैन्याने आपले मोर्चे सरहद्दीवर रोखले.

शांतताप्रिय भारत सरकारने पोर्तुगालला खलिता धाडला. " पोर्तुगालने भारताच्या वसाहतीतून ताबडतोब बाहेर पडावे आणि आंतरराष्ट्रीय शांततेला धोकादायक असणारे शल्य काढून टाकावे, " अशी भारताने पोर्तुगालला विनंती केली. पत्रात पुढे असे कळविण्यात आले की, भारतीय जनतेने आपले स्वातंत्र्य पूर्ण करण्यासाठी आपल्या भूप्रदेशातील वसाहती नष्ट करण्याचा निश्चय केला आहे. काळवेळ ओळखून,

इतिहासाचा क्रम जाणून पोर्तुगाल भारतातून जाईल, अशी आशा भारताने व्यक्त केली. तिला पोर्तुगालकडून साथ मिळाली नाही. उलट भारतीय प्रदेशावर पोर्तुगीज सैन्याने छुपे हल्ले केले. प्रतिहल्ला करण्यासाठी आरमार सिद्ध केले. पाकिस्तानमार्गे गोव्यातील स्त्रिया व बायकामुले पोर्तुगालला पाठविण्यात आली. सैनिकांनी भरलेली जहाजे भारताकडे निघाली.

बऱ्या बोलाने पोर्तुगीज वसाहती सोडून जाणार नाहीत, अशी भारताची खात्री झाली. भारत सरकारने सेनापतींच्या नेमणुका केल्या. मेजर जनरल चौधरींच्याकडे नेतृत्व देण्यात आले. आरमाराची सूत्रे ॲडमिरल सोमण यांनी स्वीकारली. विमानदलाचे नेतृत्व एअर मार्शल इंजिनियर, एअर व्हाईस मार्शल अर्जुनसिंग व पिंटो यांच्याकडे आले. वरिष्ठ भारतीय अधिकारी सरहद्दीवर जमले. पहाणी करून त्यांनी व्यूहरचना केली. आत्मविश्वासाने मातृभूमीच्या मुक्ततेसाठी तयारी पूर्ण झाली. दीव, दमण भोवतीही भारतीय फौजांनी आपली तयारी केली.

दि. १७ डिसेंबर १९६१ म्हणजे गीताजयंतीचा दिवस. रात्र झाली. आकाश निरभ्र होते. आकाशातून चंद्रमा आपल्या मंद प्रकाशाचा पृथ्वीवर वर्षाव करीत होता. वातावरण शांत होते. मध्यरात्रीनंतर तोफांचा गगनभेदी गडगडाट झाला. भारतीय सैन्याने निरनिराळ्या मोर्चांमधून अनेक ठिकाणांहून गोवा, दीव, दमण, भागात प्रवेश केला. भारताच्या भूमीवरील वसाहतीचा कलंक पुसून टाकण्यासाठी व पोर्तुगिजांच्या राक्षसी अत्याचारातून भारतीय जनतेची सुटका करण्यासाठी मोठ्या हिंमतीने सैन्याने आगेकूच केले. पोर्तुगीज जाता जाता रस्ते, पूल, उध्वस्त करतील, अडथळे येऊन आगेकूच मंदावेल याची कल्पना असल्यामुळेच भारतीय सैनिकांनी नवीनच पद्धतीचा अवलंब केला. भारतीय जवान व त्यांचे अधिकारी खांद्यावर बंदुका, मशीनगन्स आणि इतर शस्त्रे घेऊन पायीच

आगेकूच करत गेले. जनरल, ब्रिगेडियर असे मोठमोठे अधिकारीही पन्नास पन्नास मैल चालत गेले. त्याच वेळी भारतीय विमानदलाची विमाने गोव्यावर घिरट्या घालू लागली. विमानांनी मराठी, इंग्रजी, पोर्तुगीज व कोकणी भाषेत छापलेल्या असंख्य पत्रकांचा गोव्यातील जनतेवर वर्षाव केला. त्यात लिहिले होते :

" गोव्यातील जनतेच्या अब्रूचे व स्वाभिमानाचे संरक्षण करण्यासाठी आणि पोर्तुगीज जुलमापासून आणि अत्याचारांपासून तिचे संरक्षण करण्यासाठी भारतीय सैन्य आज गोव्यात शिरत आहे. ज्या मातृभूमीपासून गोव्यातील जनता शतकानुशतके बाजूला फेकली गेली, तिच्या पुनर्मीलनासाठी व सुरक्षिततेसाठी भारतीय सेना आपल्या जीवाचे रान करील. ह्या आणीबाणीच्या प्रसंगी गोव्याच्या जनतेने सावध राहावे. जाता जाता पोर्तुगीज गोव्याचा नाश करतील. आपण गेल्यावर गोव्याचे वाटोळे झाले तरी त्याचे सुखदुःख त्यांना नाही. ते येथील पूल, आगगाड्या, देवळे, चर्चे, शाळा व बंदरे यांचा नाश करतील. कोट्यवधी रुपयांचा होणारा सर्वनाश गोव्यातील जनतेने थांबविला पाहिजे. गोमंतकीयांनो, शांत रहा, धीर धरा, स्वातंत्र्याचे आनंदाने स्वागत करा. त्याचे संरक्षण करा. "

गोव्यातील दाभोळी विमानतळावर भारतीय विमानदलाने बॉम्ब्स टाकून तो शत्रूच्या विमानांना वापरता येणार नाही, असा करून टाकला. भारतीय आरमाराने अंजदीव बेटावर भडिमार करून नौसैनिक बेटावर उतरविले. तेथे पोर्तुगिजांनी शरणागतीसाठी पांढरे निशाण दाखविले, भारतीय नौसैनिक पुढे जाताच त्यांच्यावर विश्वासघाताने पुनः गोळीबार सुरू केला. त्यामुळे सहा नौसैनिक अंजदीव बेटावर कामास आले. मातृभूमीच्या सुटकेसाठी त्यांनी सर्वस्वाचे बलिदान केले. अशीच फसवणूक दीव, दमण, अग्वादचा तुरुंग इथे झाली. त्यामुळे भारतीय

सैन्यातील काही जवान व सैनिक धारातीर्थी पडले.

गोव्यातील जनतेने सैन्याचे हर्षभराने स्वागत केले. त्यांना पोर्तुगीजांनी विरोध असा केलाच नाही. ते आपली हत्यारे, रणगाडे, विमाने टाकून माघार घेत पळू लागले. स्थानिक जनतेने भारतीय सैन्याला पोर्तुगिजांनी पेरलेले सुरुंग दाखविले. त्यांना नद्या पार करण्यास होड्या दिल्या.

लोण्यात सुरी खुपसावी असे सैन्य घुसले. पोर्तुगीज सत्ता कोलमडली. गोव्याचे गव्हर्नर जनरल पळाले. एका खाजगी घरात ते लपून बसले.

भारतीय सेनेने हां हां म्हणता गोव्याची राजधानी पणजी गाठली. दीवचा किल्ला सर झाला. सर्व ठिकाणी पोर्तुगिजांची निशाणे काढून भारतीय राष्ट्रध्वज सन्मानपूर्वक फडकू लागले. जनतेने आणि जवानांनी राष्ट्रध्वजाला अभिमानाने वंदना दिली. हजारो पोर्तुगीज सैनिकांना कैद करण्यात आले. भारतीय विमानदलावर गोळीबार करणाऱ्या अल्बुकर्क या पोर्तुगीज बोटीला गोवा बंदरात भारतीय नौदलाने जलसमाधी दिली. ह्या मोहिमेच्या वेळी अनेक देशी आणि परदेशी वार्ताहर गोव्यात होते. त्यांनी भारतीय सैन्याची खूप प्रशंसा केली. त्याच्या जलद हालचाली, संयमपूर्ण वागणूक, सौजन्य यांची सर्वांनी तारीफ केली. एके ठिकाणी भारताच्या एका छोट्या तुकडीची पोर्तुगीजांच्या मोठ्या तुकडीशी गाठ पडली. पोर्तुगीज सैनिक मशीनगन्स, स्टेनगन्स व इतर आधुनिक साधनांनी सुसज्ज होते; पण भारतीय तुकडीने त्यांना शरण यावयास लावले. असे करताना भारतीय सैनिकांनी आपल्या कंबरेची पिस्तुलेही बाहेर काढली नाहीत!

गोवामुक्तीच्या मोहिमेत एकूण ४५ पोर्तुगीज ठार व ५१ सैनिक जखमी झाले. भारताचे २२ सैनिक ठार झाले. ५३ सैनिक जखमी झाले. सुमारे तीन हजार पोर्तुगीज सैनिक व त्यांचे अधिकारी कैद

करण्यात आले. भारताला युद्धसाहित्याचे मोठे साठे मिळाले. ते सर्व परदेशी बनावटीचे होते. सापडलेल्या युद्धसाहित्याचा वापर पोर्तुगीज करते तर भारतीय सैन्यास मोठी हानी सोसावी लागली असती. पण ती वापरण्याचे नैतिक धैर्य त्यांना झाले नाही. ४५१ वर्षांचे पारतंत्र अवघ्या वीस तासांत संपले.

गोवामुक्तीच्या बातमीने भारतीय जनता आनंदाने बेहोष झाली. भारतीय आकाशवाणी जगभर सांगत होती, " ऐका हो ऐका, गोमंतक मुक्त झाले ! भारताने गोवा जिंकला ! " या यशस्वी लष्करी कारवाईचे नाव ' विजय मोहीम ' असे ठेवण्यात आले. सैन्य, आरमार व विमानदल या सर्वांनी एकदिलाने ती यशस्वी केली. एक ऐतिहासिक कार्य पार पडले. सैन्याचे नेतृत्व मे. ज. क्यांडेथ यांनी केले. भारत सरकारने त्यांनाच गोव्याचे लष्करी प्रशासक म्हणून नेमले.

गोव्याच्या भूमीतून परकीय सत्ता नष्ट झाली. भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांनी गोव्याला भेट दिली. गोव्याच्या जनतेला आनंदाचे भरते आले. पंतप्रधानांच्या भाषणाला जनसागर लोटला. लोकांची अंतःकरणे स्वातंत्र्याच्या वाऱ्याने हेलावली. " परके सत्ताधारी गेले. आता गोव्याचे भवितव्य गोमंतकीय जनतेने ठरवावयाचे आहे. ती जे ठरवील, ते भारत सरकार अमलात आणील " असे आश्वासन पंडितजींनी दिले. निवडणुका झाल्या. निवडून आलेले नवे मंत्रिमंडळ कारभार पाहू लागले. गोमंतकाचा या पुढील विकास, प्रगती, विलीनीकरण-इत्यादी सर्व गोष्टी गोव्यातील प्रजेच्या इच्छेनुसार पार पडतील. गोव्यातील निसर्गसौंदर्य आणि मानवी सौजन्य या गोष्टी पुढील काळात तशाच राहतील, यात शंका वाटण्याचे आता कारणच उरले नाही.

□ □ □

१२ : गोव्यातील देवस्थानें

□ □ □ □ □ □ □ □ □ □ □ □ □ □

पोर्तुगीज धर्मवेडयांच्या जुलुमाने गोव्यातील देवस्थाने भ्रष्ट झाली. देउळे राउळे पाडून त्याच मालमसाल्यात ख्रिस्ती प्रार्थनामंदिरे बांधली गेली. त्या सर्वांतून चुकूनमाकून वाचलेली व चोरूनमारूनन रक्षिलेली अशी काही देवस्थाने गोव्यात आहेत. गोव्यातील जनतेला ती फार प्रिय आहेत. गोव्यातील देवस्थाने छोटी, टुमदार; पण मोठी कलापूर्ण आणि सुरेख अशी आहेत. त्यांचे बांधकाम कमालीचे साधे असते. देवस्थाने हिरव्यागार शेतांनी व नारळीच्या दाट बागांनी वेढलेली आहेत. त्यांच्याभोवती स्वच्छ पाण्याचे पाट वहात असतात. असलीच तर एखादी दीपमाळ, छोटीशी बारव किंवा तलाव देवालयाच्या परिसरात असतो. पांढरा स्वच्छ रंग लावलेली देवळे, हिरव्यागार झाडीत फारच उठून दिसतात. देवालयातील टापटीप, स्वच्छता पाहून मनास प्रसन्नता येते. या अनेक देवस्थानांत मंगेश, बांदिवडे गावातील श्रीनागेश, रामनाथ, शांतादुर्गा, महालक्ष्मी, नृसिंह ही देवस्थाने प्रसिद्ध आहेत.

मंगेशीचे देवस्थान जुने आहे. पेशव्यांनी देवालयास उत्पन्न दिले

आहे. मंगेशीचे देवस्थान एखाद्या संस्थानाप्रमाणे सुस्थितीत आहे. देवालयाकडे जाणारा राजरस्ता दगडांनी बांधून काढलेला आहे. मंदिराजवळ उंच दीपमाळ, तुळसीवृंदावन, दोन्ही बाजूंना टुमदार अग्रशाळा असा देखावा असतो. देवालयात शिवलिंग असून त्याची नित्य पूजा चाललेली असते. मंगेश देवस्थानाबद्दल स्थानिक जनतेत अत्यंत आदर आहे.

गोव्यातील दुसरे प्रख्यात देवस्थान शांतादुर्गा देवीचे. गोव्यातील सारस्वत ब्राह्मणांचे हे कुलदैवत आहे. पोर्तुगिजांनी मूळच्या देवालयाचा नाश केला. सध्याचे मंदिर शाहू महाराजांच्या पदरी असणाऱ्या नारोराव शेणवी यांनी बांधले. थोरले बाजीरावांनी कवळे हा गाव देवालयास इनाम म्हणून दिला. देवालयाच्या भोवती दीपस्तंभ व तलाव आहे. त्यामुळे देवालयाची शोभा अवर्णनीय आहे. देवालयाच्या भोवती भातशेती व नारळीची झाडे यामुळे निसर्गशोभाही विपुल आहे. शंकर व विष्णू या दोन प्रबळ देवतांमध्ये भांडण लागले असता एका हाताने शंकराला व दुसऱ्या हाताने विष्णूला दुर्गेने बाजूला करून शांत केले. यावरूनच देवीला शांतादुर्गा हे नाव पडले.

बांदिवडे येथील महालक्ष्मी ही काही घराण्यांची कुलदेवता आहे. तिची मूर्ती अंबाबाईसारखी आहे. रामनाथ व नागेश ही शंकराची स्थाने आहेत. देवस्थानात पुजारी किंवा बडवे यांच्याकडून भक्तांची कुचंबणा मुळीच होत नाही. मनास वाटेल त्याप्रमाणे आपल्या ऐपतीप्रमाणे देवाची उपासना करता येते. देवासाठी खर्च केल्यास त्याची रीतसर पावती देवस्थानचे व्यवस्थापक देतात. जमा होणाऱ्या पैशाची सेवेकरी मंडळीत वाटणी होते.

गोव्यात पोर्तुगीज आल्यानंतर त्यांनी सक्तीने येथे जोरात ख्रिस्ती धर्माचा प्रसार केला. गोवा हे कॅथॉलिकांचे मोठे केंद्र झाले. येथून त्यांनी सिलोन, चीन व अतिपूर्वेकडे धर्मप्रसारार्थ मोठमोठ्या योजना आखल्या. हजारो लोकांना सक्तीने बाटविले. गोवे हे पूर्वेकडील रोमच झाले. पोर्तुगिजांनी गोवे

काही चर्चेस बांधली आहेत. ती चर्चेस भव्य आणि कलापूर्ण आहेत. बॉम जीजसच्या चर्चमध्ये सेन्ट फ्रॅन्सिस झेवियर या धर्मोपदेशकाचे मृतशरीर पेटीत भरून ठेवले आहे. ते न नासता तसेच राहिले आहे. त्या पवित्र देहाचे दर्शन घेण्यांसाठी लांबून ख्रिस्ती लोक येतात. मधून मधून शव-पेटिका उघडून दर्शनासाठी मोकळी करून ठेवतात. संभाजीराजांनी गोव्यावर स्वारी केली, गोवा जाण्याची वेळ आली त्याप्रसंगी पोर्तुगीज गव्हर्नर चर्चमध्ये जाऊन सेंट फ्रॅंसिसच्या शवाजवळ प्रार्थना करीत बसला. त्याच वेळी मोंगलांचा पेच आल्याने संभाजीमहाराज परत फिरले ! पोर्तुगिजांची समजूत मात्र सेन्ट फ्रॅंसिस झेवियरच्या कृपेमुळे हे झाले अशी होती. ‘ विजय ’ मोहिमेआधीही शवपेटी उघडून पोर्तुगीज राज्यकर्त्यांनी प्रार्थना केली होती, पण पोर्तुगीज सत्ता जावी आणि गोवे परकीयांच्या कचाट्यातून मुक्त व्हावे, अशीच त्या संताची इच्छा होती की काय न कळे !

□ □ □



१३ : गोमंतकाच्या इतिहासातील दिनविशेष

(१) इ. सन १४९८ वास्को-डी-गामा हिंदुस्थानात कालिकत बंदरात आला. युरोपियनांना हिंदुस्थानाचा नवा सागरी मार्ग सापडला.

(२) इ. सन १५०३ पोर्तुगिजांनी कोचीनला व्यापारी वखार घातली.

(३) इ. सन १५१० पोर्तुगिजांनी गोवे घेतले.

(४) इ सन १५३४ पोर्तुगीज मुंबई, वसई, ठाणे, साष्टी घेतात.

(५) इ. सन १५३५ दीव पोर्तुगिजांच्या ताब्यात येते. ते तेथे तटबंदी उभारतात.

(६) इ. सन १५५९ दमणवर पोर्तुगिजांचा अंमल बसतो.

(७) इ. सन १५६० सक्तीने ख्रिस्ती धर्माचा प्रसार.

(८) इ. सन १५७९ फादर स्टीफन्सचे हिंदुस्थानात आगमन. ख्रिस्त पुराणाची रचना.

(९) इ. सन १६१९ फादर स्टीफन्सचा मृत्यू.

(१०) इ. सन १६३० छत्रपती शिवाजी महाराजांचा जन्म.

(११) इ. सन १६६७ छत्रपतींची गोव्याचा एक प्रांत बारदेस वर स्वारी.

(१२) इ. सन १६६७ शिवाजी-पोर्तुगीज तह.
(१३) इ. सन १६६८ पोर्तुगीज छत्रपतींच्याविरुद्ध मोंगलांशी तह करतात.
(१४) इ. सन १६७० छत्रपतींच्या आरमाराशी पोर्तुगीज आरमाराचे युद्ध.
(१५) इ. सन १६८० छत्रपती शिवाजीमहाराजांचा मृत्यू.
(१६) इ. सन १६८२ पोर्तुगीज संभाजीविरुद्ध रणमस्तखानाला मदत करतात.
(१७) इ. सन १६८३ संभाजीमहाराजांची फोंड्यावर स्वारी. संभाजीराजे गोवे घेण्याच्या तयारीत.
(१८) इ. सन १६८४ संभाजीमहाराजांशी पोर्तुगीज तह करतात.
(१९) इ. सन १७०५ शेंडीवर आठ रुपये कर.
(२०) इ. सन १७१७ मराठे साष्टी लुटतात.
(२१) इ. सन १७२० बाजीराव पेशवे होतात.
(२२) इ. सन १७२२ पिलाजी जाधवराव फिरंगणात स्वारी करून लुटालूट करतात.
(२३) इ.सन १७३१-३० पेशव्यांची पोर्तुगिजांवर मोहीम.
(२४) इ. सन १७३२ मराठ्यांचा पोर्तुगिजांशी तह.
(२५) इ.सन १७३६-३९ मराठ्यांची मोहीम. मराठे वसईच्या आजूबाजूची ठाणी घेतात.
(२६) इ. सन १७३७ वसईवर मराठे हल्ला करतात. मराठे तारापूर घेतात.
(२७) इ. सन १७३८ मराठे वसईस वेढा देतात.
(२८) इ. सन १७३९ मे वसई फत्ते झाली.

□ □ □

(२९) इ. सन १७५५
ते १९१२ राण्यांची पोर्तुगीजांविरुद्ध बंडे.

(३०) इ. स. १९५४ नगरहवेलीची मुक्तता.

(३१) इ. सन १९५४–५५ सत्याग्रह मोहीम.

(३२) १९५५ ऑगस्ट १५ सत्याग्रहींचे बलिदान.

(३२) इ. स. १९६१–नोव्हेंबर डिसेंबर–पोर्तुगिजांचे भारतीय प्रदेशावर हल्ले.

(३४) १९६१ डिसेंबर दि. १७–१८—‘ विजय मोहीम ’—
भारतीय सैन्य गोव्याची मुक्तता करते.
पोर्तुगिजांकडून शरणागती.

☐ ☐ ☐


गोमंतक
महाराष्ट्र राज्य
पेडणे
म्हापसें
बारदेश
डिचोली
सत्तरी
पणजी
तिसवाडी
फोंडें
सांगें
मुरगांव
सासष्टी
मडगांव
केपें
काणकोण
पर्तगाळी
अरबी समुद्र
म्हैसूर राज्य
म्हैसूर राज्य

१४ : गोमंतकातील स्थलविशेष

□ □ □ □ □ □ □ □ □ □ □ □ □ □

गोव्यातील प्रमुख शहरे

पणजी – राजधानीचे शहर; लोकसंख्या : ३५४६८.

मडगाव – साष्टी तालुक्यातील प्रमुख शहर; लोकसंख्या : १५३६४

म्हापसे – बार्देस तालुक्यातील प्रमुख शहर; लोकसंख्या : ८१९८.

वास्को-द-गामा – मुरगाव तालुक्यातील प्रमुख शहर; लोकसंख्या ६४८३.

महत्त्वाची गावे

पेडणे [पेडणे तालुका]

डिचोली [डिचोली तालुका]

साखळी [डिचोली तालुका]

केपे [केपे तालुका]

कुडचडे [केपे तालुका]

फोंडे [फोंडे तालुका]

सांगे [सांगे तालुका]

काणकोण [काणकोण तालुका]

नद्या

तेरेखोलची नदी – ही नदी पेडणे तालुक्यात असून गोव्याच्या उत्तरेस आहे. २० किलोमीटर्सपर्यंत ती जलवाहतुकीस योग्य आहे.
छापोरा नदी – ही बार्देस व पेडणे तालुक्याच्या मध्ये असून २५ किलोमीटर्सपर्यंत ती वाहतुकीस उपयोगी आहे.
मांडवी – पणजी शहर व बेती यांच्या मध्ये असून, या नदीचे अनेक फाटे पसरलेले आहेत. १०० किलोमीटर्सपर्यंत ती वाहतुकीस योग्य आहे.
जुवारी – मुरगाव तालुक्यात ही नदी असून सर्व नद्यांत ही मोठी नदी आहे. हिला अघनाशिनी असे प्राचीन नाव आहे. ८० किलोमीटर्सपर्यंत ती वहातुकीस उपयोगी पडते.
साळ – ही नदी साष्टी तालुक्यात असून २० किलोमीटर्सपर्यंत वाहतुकीस योग्य आहे.
तळपण – ही नदी काणकोणमध्ये असून १२ किलामीटर्सपर्यंत वाहतुकीस योग्य आहे.
गालजीबाग – ही नदीही काणकोणमध्येच असून फक्त ३ किलोमीटर्सपर्यंत वाहतुकीस योग्य आहे.

सहलीसाठी स्थळे

जुने बेट – पणजीपासून २३ किलोमीटर्स अंतरावर असून फेरी बोटीतून या बेटावर जाता येते.
खोर्जुवे किल्ला – हळदोण्यानजीक असून बेतीपासून १५ किलोमीटर्स अंतरावर आहे.
तेरेखोलचा किल्ला – तेरेखोल नदी पलिकडील डोंगरमाथ्यावर हा किल्ला उभा असून बेतीपासून ४२ किलोमीटर्स अंतरावर आहे. कोलवाळ–माखजन व कैरी–तेरेखोल अशी फेरी वाहतुकीची सोय आहे.

हळर्णचा किल्ला – हा एक ऐतिहासिक किल्ला असून कोलवाळहून अथवा माखजनहून अवघ्या १५ किलोमीटर्स अंतरावर आहे.

चंद्रनाथ मंदिर–मडगाव शहरापासून १६ किलोमीटर्स अंतरावर असलेल्या ‘ पर्वत ’ नामक ११७० फूट उंचीच्या पर्वताच्या शिखरावर श्री चंद्रेश्वर भूतनाथाचे हे अतिप्राचीन मंदिर आहे.

राण्यांचा वाडा – डिचोली तालुक्यातील साखळी येथील हा एक ऐतिहासिक वाडा असून वाड्याच्या जवळच श्रीविठ्ठल मंदिर आहे. पोर्तुगीजांविरुद्ध या राण्यांनी अनेक वेळा बंडे पुकारली होती.

हरवळ्याचा धबधबा – राण्याच्या वाड्यापासून थोड्याच अंतरावर हा धबधबा आहे. आजूबाजूचे सृष्टिसौंदर्य पहाण्यासारखे आहे.

पांडवांची गुंफा – हरवळ्याच्या धबधब्यानजीकच ही गुंफा असून ती २००० वर्षांपूर्वीची असावी, असे म्हणतात.

नाणूस किल्ला – निसर्गरमणीय सत्तरी तालुक्यातील वाळपई येथून ३ किलोमीटर्स अंतरावर या ऐतिहासिक किल्ल्याचे ध्वंसावशेष आहेत.

श्रीब्रह्मदेव मंदिर – किमान पाच शतकापूर्वीचे हे प्राचीन मंदिर वाळपई-पासून ७ किलोमीटर्स अंतरावर असलेल्या करंबळी गावी आहे.

वाघुरी टेकडी – वाळपईपासून १२०५ किलोमीटर्स अंतरावर असलेली ही रमणीय टेकडी आहे.

मोर्लेगड टेकडी – वाळपईपासून १६०२ किलोमीटर्स अंतरावर आहे. हीहि एक रमणीय टेकडी आहे.

दूधसागर धबधबा – नितांत रमणीय असा हा फेनधवल प्रपात आहे. ६०३ मीटर उंचीवरून खाली घनदाट जंगलाने वेढलेल्या दरीत उडी घेणाऱ्या या धबधब्याकडे पहाताना अवर्णनीय आनंदाने हृदय नाचू लागते. हा धबधबा पहाण्यासाठी रेल्वेने जावे लागते. तो मडगावपासून ६२ किलोमीटर अंतरावर आहे.

तांबडी सूर्ल–शिवमंदिर – हे शिवमंदिर तांबडी सूर्ल या भागातील घनदाट जंगलात असून ते कदंबकालीन म्हणजे बाराव्या शतकातील असावे असा तर्क आहे. त्या मंदिराचे शिल्प अत्यंत रमणीय असून त्यात निरनिराळ्या शिल्पकलांचे प्रतिबिंब उमटलेले आहे.

रोमन कॅथॉलिक चर्चेस

१. कॅथेड्रल चर्च.
२. ब्रॅसिलिका ऑफ बॉम जीसस [या चर्चमध्येच सेंट फ्रान्सीस झेवियर यांचा पार्थिव देह जतन करून ठेवलेला आहे.]
३. सेंट कॅजेटन कन्व्हेंट.
४. सेंट ऑगस्टीन्स डॉवर.
५. सेंट मोनिका मोनेस्टरी
६. कोन्व्हेंट सेंट फ्रान्सिस ऑफ ॲरसीसी.
७. सेंट कॅथेराईन चॅपेल.
८. सेंट ॲंथनी चॅपेल.
९. अवर लेडी ऑफ कन्सेप्शन चर्च.
१०. अवर लेडी ऑफ मिरॅक्लस चर्च
११. द होली घोस्ट चर्च.
१२. चर्च ऑफ शोल.
१३. चिंचणीचे चर्च.
१४. सें. ॲंड्रयूज चर्च.
१५. पिलारचे चर्च.
१६. सें. ॲना चर्च.
१७. पीडाडे चर्च.

मंदिरे

१. श्रीशांतादुर्गा – कवळे
२. श्रीरामनाथ – बांदोडे
३. श्रीमहालक्ष्मी – बांदोडे
४. श्रीनागेश – बांदोडे
५. श्रीमहालसा – म्हर्दोळ
६. श्रीमंगेश – मंगेशी
७. श्रीदेवकीकृष्ण – माशेल
८. श्रीगणपती – माशेल
९. श्रीकामाक्षी – शिरोडा
१०. श्रीसप्तकोटीश्वर – शिरोडा
११. श्रीदामोदर – जांबावली
१२. श्रीचंद्रेश्वर भूतनाथ – पर्वत मडगावनजिक
१३. गोपाळ गणपती – फर्मागुडी

☐ ☐ ☐